बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)

चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



वर्ष -९ | गोंदिया | अंक ४४ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.७ ते १३ ऑक्टोंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## देवरी बीडीओसह सर्वच विभागप्रमुख कार्यालयातून बेपत्ता




**देवरी :** तालुक्याचे महत्त्वाचे कार्यालय असणाऱ्या देवरी पंचायत समितीला आज मंगळवारी दुपारी १ वाजेच्या सुमारास सामाजिक कार्यकर्ते भुपेन्द्र मस्के यांनी भेट दिली असता यावेळी बरेचसे कर्मचारी दौ–यावर असल्याचे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात त्याची हलचल रजिस्टरमध्ये नोंद नसल्याने पंचायत समिती कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाटयावर आलेला आहे.

विविध शासकीय कामांसाठी तालुक्यातुन शेकडो नागरिक पंचायत समिती कार्यालयास भेट देतात. अनेक गावांचे सरपंच , सदस्य व नागरिक पंचायत समितीला कामानिमित्त भेटी देतात.मात्र आज जेव्हा कार्यालयास भेट दिली, तेव्हा गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, विस्तार कर्मचारी, मनरेगा अंतर्गत काम करणारे कर्मचारी अनुपस्थित आढळून आले.कार्यालयात विचारणा केली असता ते दौऱ्यावर व हलचल नोंदवहीत नोंद नाही. यावरून गटविकास अधिकारी यांचे भोंगळ कारभार व प्रशासनावर पकडच नसल्याचे दिसून येते.

विशेष म्हणजे पंचायत समिती कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी मंगळवारी दौरा करू नये असे पंचायत समितीच्या मासिक बैठकीत ठरवले गेले होते. पण लोकप्रतिनिधी नसल्यामुळे कर्मचारी बेशिस्त झाले कि काय? असा प्रश्न पडला आहे . कोरोना परिस्थितीचा फायदा घेत प्रत्येक दिवशी मोठ्या प्रमाणात कर्मचारी गैरहजर आढळून येतात त्यामुळे नागरिकांचे कामे रेंगाळली आहेत. विशेषतः मनरेगाचे व्यक्तिक लाभाचे एकही काम प्रगतीपथावर नाही.

## बंधाऱ्यात पोहायला गेलेल्या बालकाचा मृत्यू



**लाखांदूर :** गावालगतच्या बंधाऱ्यावर पोहण्यासाठी गेलेल्या एका बालकाचा बुडून मृत्यू झाला. ही घटना लाखांदूर तालुक्याच्या हरदोली येथे मंगळवारी सकाळी घडली.खेतन प्रभू फुंडे (८) रा. हरदोली ता. लाखांदूर असे मृताचे नाव आहे.

गावातील चार-पाच मुले नाल्यावर असलेल्या बंधा?यावर पोहण्यासाठी मंगळवारी सकाळी गेली होती. बंधाऱ्यावरून खोल पाण्यात उडी मारून पोहणे सुरू होते. अशातच खेतन सुमारे पाच फूट खोल खड्ड्यात तळाला गेला. तो वर न आल्याने सहकारी मुले घाबरली. त्यांनी गावाकडे एकच धूम ठोकत गावात खेतन बुडाल्याची माहिती दिली.

अख्खे गाव खेतनला वाचविण्यासाठी धावले. पाण्यातून त्याला बाहेर काढण्यात आले. प्राथमिक उपाययोजना घटनास्थळावर करण्यात आली. त्याला खाजगी दवाखान्यात दाखविण्यात नेण्यात आले. मात्र त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरदोली येथील दुसऱ्या वर्गात तो शिकत होता. आई-वडिलांना एकुलता एक खेतनचा मृत्यू झाल्याने गावात हळहळ व्यक्त होत आहे.

## भविष्यात कोरोनाचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता नियोजन करा-विधानसभा अध्यक्ष नाना पटोले

**गोंदिया:** कोरोना या जागतिक महामारीमुळे संपूर्ण जग आज त्रस्त झाले आहे. प्रत्येकाने वेळीच सावध होऊन कोरोनाच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठी योग्य ती खबरदारी घेतली पाहिजे.१५ ऑक्टोबरनंतर पुन्हा कोरोनाचा संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने विविध यंत्रणांना सोबत घेऊन आतापासूनच नियोजन करण्याचे निर्देश विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले.

६ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात जिल्ह्यातील कोरोना बाबतच्या परिस्थितीचा आढावा घेतांना श्री पटोले बोलत होते. यावेळी आमदार विनोद अग्रवाल, आमदार सहसराम कोरोटे, जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे,पोलीस अधीक्षक विश्व पानसरे,अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री पटोले पुढे म्हणाले, आरोग्य यंत्रणेने बाधित रुग्णांवर वेळीच उपचार करावे. सोबतच मृत्यूदर कमी करण्यासाठी काम करावे. जिल्ह्यातील बाधित रुग्ण उपचारातून बरे होण्याचे प्रमाण चांगले आहे. जिल्ह्यात कोरोना आजाराशी लढा देण्यासाठी प्रशासनाने नवीन अधिकारी नेमून दिले आहे. संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी ऊर्जेने काम करावे. त्याचप्रमाणे संसाधनांची उपलब्धता करून देण्यात आल्याचे



त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचे कार्ड असलेल्या व्यक्तींना मोफत उपचार मिळत असल्याची माहिती लोकांपर्यंत आरोग्य विभागाने पोहोचवावी असे सांगून श्री पटोले पुढे म्हणाले, खाजगी रुग्णालयांकडून आवश्यक तेवढ्याच बिलाची आकारणी व रुग्णांची समस्या सोडविण्यासाठी आणि खाजगी रुग्णालयांकडून रुग्णांची या काळात लूट होणार नाही याकडे प्रशासनाने विशेष लक्ष दयावे. खाजगी रुग्णालयांचे सनियंत्रण करावे. नागरिकांची किंवा रुग्णाची तक्रार येणार नाही. रुग्णालयाच्या आतमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत. तसेच बाहेर डिस्प्ले बोर्ड लावावेत. त्यामुळे नागरिकांना माहिती मिळण्यास मदत होईल. २४ तास सुरू असलेल्या नियंत्रण कक्षात तक्रार करणाऱ्या नागरिकांना संपूर्ण माहिती दिली जावी असेही श्री पटोले यावेळी म्हणाले.

जिल्ह्यातील धान खरेदी प्रकरणी चौकशी समिती पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हे सदस्य असतील. अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांचे धान खरेदी करण्यात यावे. जिल्ह्यात प्रलंबित असलेले वनहक्क पट्टे योग्य ती कार्यवाही त्वरित करून संबधितांना वितरित करण्यात यावे.असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

आमदार अग्रवाल म्हणाले,मागील पंधरा दिवसात आरोग्य यंत्रणेच्या कामात सुधारणा झाली आहे. परंतु अजूनही कामात सुधारण्याची आवश्यकता आहे. कोरोना बाधित गर्भवती महिलांची प्रसूती पूर्वी इथे होत नव्हती आता प्रसूती इथे करण्यात येत आहे. आरोग्य विभागातील रिक्त पदे त्वरित भरल्यास आरोग्य यंत्रणेवर ताण कमी होण्यास मदत होणार असल्याचे ते म्हणाले.

आमदार कोरोटे म्हणाले, आपल्या स्थानिक विकास निधीतून आरोग्य यंत्रणा सुदृढ करण्यासाठी १० लक्ष रुपये निधी देण्यात आला आहे. यातून खरेदी केलेली सामग्री देवरी मतदारसंघात कोणत्या ठिकाणी उपलब्ध करून दिली आहे त्याची माहिती मिळाल्यास रुग्णांना तेथे उपचार घेण्याकरीता जाण्याबाबत कळविण्यात येईल. असे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी श्री. मीना यांनी जिल्ह्यातील कोरोनाबाबतच्या परिस्थितीची माहिती संगणकीय सादरीकरणातून विधानसभा अध्यक्षांना दिली. २४ तासात सकारात्मक रुग्णांचा तपासणी अहवाल मिळत असून राष्ट्रीय पोर्टलवर देखील अद्यावत माहिती देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

अपर जिल्हाधिकारी खवले यांनी जिल्ह्यात ३ ऑक्टोबर रोजी माझे कुटुंब- माझी जबाबदारी -माझी जनजागृती या मोहिमेतून करण्यात आलेल्या जनजागृतीबाबतची माहिती दिली. जिल्ह्यातील ७४ टक्के कुटुंबापर्यंत एका दिवशी पोहोचल्याचे त्यांनी सांगितले.

सभेला निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी राहुल खांडेभराड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ नरेश तिरपुडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भूषणकुमार रामटेके, अमरिश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शाम निमगडे, जिल्हा पुरवठा अधिकारी देवराव वानखेडे, जिल्हा उपनिबंधक शुद्धोधन कांबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गणेश घोरपडे यांची यावेळी उपस्थिती होती.

## पाणी व स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिलासा

**भंडारा :** राज्यातील जिल्हा, पाणी व स्वच्छता मिशन आणि तालुकास्तरीय गटसाधण केंद्रातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यास मुंबई उच्च न्यायालयाचे स्थगिती दिली आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील आदेशापर्यंत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन आणि तालुकास्तरीय गटसाधन केंद्रामधून कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा सुरू ठेवण्याचा आदेश शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने ३० सप्टेंबर रोजी राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी स्वरूपात दिला आहे. त्यामुळे राज्यातील जिल्हा परिषदेंतर्गत पाणी व स्वच्छता मिशनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने राज्यातील ११०० कंत्राटी कर्मचाऱ्यांना २७ जुलैपासून सेवा समाप्त करण्याचा आदेश काढला होता. यावर कंत्राटी कर्मचारी संघाने पाठपुरावा केल्यानंतर ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र त्यानंतर कर्मचारी महासंघाच्या पाठपुराव्यानंतर शासनाच्या निर्णयाविरुद्ध कंत्राटी कर्मचारी महासंघाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

२६ सप्टेंबर रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आणि मुदतवाढ देण्याच्या शासनाच्या पत्रास पुढील आदेशापर्यंत उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या

सुजल महाराष्ट्र - निर्मल महाराष्ट्र
पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था

निर्णयामुळे राज्यातील ११०० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना दिलासा मिळाल्याने कर्मचारी महासंघाने शासनाचे आभार मानले आहेत.

हे सर्व कंत्राटी कर्मचारी १८ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांना कमी करून आऊटसोर्सिंग करू नये यासाठी शासनाच्या आदेशाला स्थगिती द्यावी, अशी मागणी केली होती. यावर न्यायालयाने शासनाच्या आदेशाला स्थगिती दिली आहे. त्यानुसार पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने ३० सप्टेंबर रोजी पत्र काढून जिल्हा व तालुकास्तरावरील कर्मचाऱ्यांची सेवा कायम ठेवण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना परिपत्रक काढले आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सुरक्षा द्या, अशा सूचना काही आमदारांकडून देण्यात आल्या होत्या. विधानभवनात यासंदर्भात बैठक झाली. त्याबैठकीत कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक विचार करा, अशी मागणीही करण्यात आली होती. त्यानुसार काही आमदार व कंत्राटी कर्मचारी महासंघाच्या पाठपुराव्यानंतर न्यायालयाने कर्मचाऱ्यांना दिलासा दिला आहे. त्यामुळे राज्यातील ११०० कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

## कोरोनाच्या संकटात गरोदर मातांना मातृ वंदना योजनेचा आधार

**भंडारा :** प्रधानमंत्री मातृ वंदना योजना ही केंद्र शासनाची महत्त्वाकांशी योजना आहे. ही योजना शहरी व ग्रामीण भागामध्ये दिनांक १ जानेवारी २०१७ पासुन संपूर्ण राज्यात लागु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत १ जानेवारी २०१७ रोजी अथवा तदनंतर पहिल्यांदा ज्या मातांची प्रसुती झाली आहे किंवा गर्भधारणा झाली असेल व त्यांनी शासनाचे अधिसुचित केलेल्या संस्थेत नोंदणी केली असेल अशाच पात्र महिलांना गरोदर काळात गरोदर माता, शिशु सुदृढ व निरोगी राहावे. गरोदर मातांना सकस आहार घेता यावा, याकरिता केंन्द्र व राज्य शासनाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेअंतर्गत पहिल्यांदा गरोदर असलेल्या मातेस पहिल्या जिवंत अप्रत्याकरिता तीन टपप्यामध्ये ५००० रुपयांची रक्कम दिली जाते. लॉकडाऊन काळात भंडारा जिल्ह्यातील ३४४३ महिलांच्या खात्यावर १ कोटी ९२ लक्ष २३ हजार रुपये लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले आहेत.

गरोदर मातांना स्वत:च्या व शिशुच्या सुदृढ आरोग्यासाठी सकस व पौष्टिक आहार मिळणे गरजेचे असते तसेच गरोदर कालावधीत मोलमजुरी करणाऱ्या अनेक महिलांच्या रोजगारही बुडत असतो.

सदर महिलांना सकस आहार व अंशत बुडीत मजुरी मिळावी या उद्देशाने शासनाच्या वतीने ०१ जानेवारी २०१७ या वर्षापासुन प्रधानमंत्री मातृ वंदना योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत पहिल्या जिवंत अप्रत्यापर्यंत सर्वस्तरावरील (गरोदर शासकिय कर्मचारी माता वगळून) ५ हजार रुपयाचा लाभ तीन टप्प्यांमध्ये केंन्द्र शासनाकडुन आधार संलग्न डिबीटव्दारे थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते.

## रुग्ण बरे होण्याच्या प्रमाणात सकारात्मक वाढ

**गोंदिया :** ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात कोरोनाचा उद्रेक झाल्यानंतर ऑक्टोंबरमध्ये कोरोना रुग्ण वाढीचा दर कायम राहणार का अशी चिंता शहरवासीयांना सतावित होती. मात्र ऑक्टोंबर महिन्याच्या सुरूवातीपासून रुग्णांच्या संख्येत सातत्याने घट होत असल्याचे जिल्हावासीयांची चिंता दूर झाली आहे.

१ ते ६ ऑक्टोंबर दरम्यान जिल्ह्यात एकूण ११७९ कोरोना बाधितांनी कोरोनावर मात केली आहे.६०१ नवीन रुग्णांची नोंद झाली तर ८ बाधितांचा मृत्यू झाला आहे.मार्च महिन्यापासून जिल्ह्यात कोरोनाचा शिरकाव झाला आहे. यानंतर जवळपास पाच महिने कोरोना रुग्ण वाढीचा वेग नियंत्रणात होता. मार्च ते जुलै या पाच महिन्यात २८८ बाधितांची भर पडली तर पाच बाधितांचा मृत्यू झाला होता. मात्र ऑगस्ट महिन्यात ११६९ कोरोना बाधितांची नोंद झाली तर १६ बाधितांचा मृत्यू झाला.




सप्टेंबर महिन्यात कोरोनाचा विस्फोट झाल्याने ५६६९ कोरोना बाधित आणि ७७ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला. त्यामुळे कोरोना ससर्गाच्या अनुषंगाने हे दोन महिने जिल्हावासीयांसाठी घातक ठरले. त्यामुळे जिल्ह्यातील कोरोना बधितांचा आकडा ७ हजार पार झाला तर कोरोना बळींचे शतक पूर्ण झाले.

मागील दोन महिने सातत्याने रुग्ण वाढीचा आलेख उंचावत असल्याने मृतकांच्या संख्येत वाढ होत असल्याने जिल्हावासीयांसह प्रशासनाची काळजी वाढली होती. ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीपासूनच कोरोना बाधितांच्या संख्येत घट होण्यास सुरूवात झाली तर रुग्ण बरे होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिलासादायक चित्र आहे.

मागील पाच दिवसात १४४२ कोरोना बाधितांनी कोरोनावर मात केली. तर ६०१ नवीन बाधितांची भर पडली. तर ८ बाधितांचा मृत्यू झाला. जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ७६०७ कोरोना बाधित आढळले असून यापैकी ६४४० बाधितांनी कोरोनावर मात केली आहे. तर १०५ कोरोना बाधितांचा मृत्यू झाला आहे. ऑक्टोंबर महिन्यात रुग्ण संख्येत सातत्याने घट होत असल्याने जिल्हावासीयांना दिलासा मिळाला आहे.

## महाराष्ट्र व विदर्भ एक्सप्रेस लवकरच धावणार

**गोंदिया :-** कोरोना आणि लॉकडाऊनमुळे सहा महिन्यांपासून बंद असलेली रेल्वे सेवा थोड्याफार प्रमाणात रुळावर येत आहे.अनलॉक ५ मध्ये राज्यांतर्गत प्रवासी रेल्वेसेवा सुरू करण्यास महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली आहे. त्यानुसार रेल्वे खात्याने दसरा-दिवाळी सणासाठी येत्या २० ऑक्टोबरपासून रेल्वे सुरू करण्याचे नियोजन केले आहे. त्यात मुंबई-जालना जनशताब्दी एक्स्प्रेस, मुंबई-नांदेड तपोवन एक्स्प्रेस, पुणे-नांदेड सुपरफास्ट एक्स्प्रेस या मराठवाड्यातील प्रवाशांसाठी उपयोगी ठरणींतया तीन गाड्यांचा समावेश आहे. या गाड्यांसाठी १५ ऑक्टोबरपासून आरक्षण करता येईल.



**राज्यांतर्गत या गाड्या सुरू होणार :**

मुंबई-पुणे (डेक्कन एक्स्प्रेस), मुंबई-पुणे (इंटर सिटी), मुंबई-पुणे (सिंहगड), मुंबई-पुणे (प्रगती एक्स्प्रेस), मुंबई-अमरावती एक्स्प्रेस, मुंबई-नागपूर (सेवाग्राम एक्स्प्रेस), मुंबई-गोंदिया (विदर्भ एक्स्प्रेस), मुंबई-लातूर, मुंबई-सोलापूर (सिद्धेश्वर एक्स्प्रेस), मुंबई-कोल्हापूर (महालक्ष्मी एक्स्प्रेस), पुणे-सोलापूर (हुतात्मा एक्स्प्रेस), पुणे-नागपूर सुपर फास्ट, पुणे-नागपूर (गरीबरथ एक्स्प्रेस), पुणे-भुसावळ, कोल्हापूर-गोंदिया (महाराष्ट्र एक्स्प्रेस).

इतर गाड्यांमध्ये पुणे येथून धावणाऱ्या झेलम आणि दरभंगा एक्स्प्रेसही सुरू होणार असून मुंबईहून पंजाब, मंगलोर आणि कराईकल एक्स्प्रेसही २० ऑक्टोबरपासून सुरू होतील.

## सार्वजनिक शौचालय स्पर्धेत बबई ग्रा.पं.चे राष्ट्रीय स्तरावर नामांकन

**गोंदिया:** केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागाने सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम, सौंदर्यीकरण व देखभाल व्यवस्था या बाबींना प्रोत्साहित करण्यासाठी स्वच्छ सुंदर सामुदायीक शौचालय स्पर्धा प्रत्येक वर्षी आयोजित केली जाते. जुलै ते सप्टेंबर २०२० या कालावधीत आयोजित स्पर्धेसाठी गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील बबई ग्रामपंचायत अंतर्गत तयार करण्यात आलेल्या सार्वजनिक शौचालयाचे राष्ट्रीय पातळीवर नामांकन करण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यातील अन्य ग्रामपंचायतीमध्येही चुरस वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामीण भागात शौचालयाचा नियमित उपयोग वाढविणे, गावस्तरावर स्वच्छता साधनाविषयी स्वमालकीची भावना वाढविणे, आणि सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम होऊन त्याची देखभाल होण्याच्या उद्देशाने सार्वजनिक



शौचालय योजनेला गती देण्यात आली आहे. त्यातच स्वच्छ भारत अभियानांतर्गत जिल्ह्यातही प्रत्येक कुटुंबात शासनाच्यावतीने शौचालय बांधकाम करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत आजघडीला जिल्ह्यात शौचालय बांधकामाचे उद्दीष्ट पूर्ण झाले आहे. असे असले तरी गावात स्वच्छतेविषयी अधिक भर पडावी यासाठी सार्वजनिक शौचालयाची संकल्पना केंद्र शासनाच्यावतीने राज्य शासनाला देण्यात आली. त्या अनुषंगाने अनेक गावात सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले. विशेष म्हणजे २ ऑक्टोबर रोजी स्वच्छ सुंदर सामुदायीक शौचालय स्पर्धेत देशपातळीवर दुसऱ्या क्रमांकाची मानकरी ठरलेली भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील कन्हाळगाव ग्राम पंचायतीचा केंद्र सरकारच्या जल शक्ती मंत्रालयाच्यावतीने गौरव करण्यात आला. लगतच्या भंडारा जिल्ह्याने या अभियानात बायी मारली आहे. केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागाने सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम, सौंदर्यीकरण व देखभाल व्यवस्था या बाबींना प्रोत्साहित करण्यासाठी स्वच्छ सुंदर सामुदायीक शौचालय अभियानांतर्गत स्वच्छ सुंदर सामुदायीक शौचालय स्पर्धा आयोजित केली होती. ग्रामीण भागात शौचालयाचा नियमित उपयोग वाठविणे, गावस्तरावर स्वच्छता साधनांविषयीची स्वमालकीची भावना वाढविणे आणि सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम होऊन त्याची देखभाल होण्याच्या उद्देशाने मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी तसेच यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी यांच्या माध्यमातून ही संकल्पना साकार करण्यात येत आहे. गोंदिया जिल्ह्यातही अनेक ग्रामपंचायतींनी या मोहिमेत आपला सहभाग नोंदविला आहे. त्यातच गोरेगाव तालुक्यातील बबई ग्रामपंचायतीने उत्कृष्ट सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम केले. गावचे सरपंच सोमेश रहांगडाले, ग्रामसेवक मिनाक्षी बिसेन तसेच ग्रामपंचायतचे उपसरपंच व ग्रा.पं.सदस्यांनी यात मोलाची भूमिका बजावल्याने या सार्वजनिक शौचालयाचे १२ मार्च २०२० रोजी केंद्रीय स्वच्छता व पेयजल मंत्रालय भारत सरकारचे सचिव परम अय्यर यांनी ट्विट करुन कौतुकही केले. त्यातच जुलै ते सप्टेंबर २०२० या कालावधीतील स्पर्धेसाठी राष्ट्रीय पातळीवर बबई ग्रामपंचायत अंतर्गत सार्वजनिक शौचालयाचे नामांकन झाल्याने हे जिल्ह्यासाठी गौरवाची बाब ठरली आहे.

### नामांकन अभावी जिल्हा माघारला

१ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीत घेतलेल्या स्पर्धेत जिल्ह्यातील एकही ग्रामपंचायतीचे नामांकन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले नाही. त्यामुळे या स्पर्धेत जिल्ह्यातील एकाही ग्राम पंचायतींचा सहभाग झाला नाही. परिणामी या स्पर्धेच्या निकालात जिल्हा वंचित राहिला असले असले तरी सुरु वर्षाच्या स्पर्धेत जिल्ह्यातील एका ग्रामपंचायतीचा सहभाग झाल्याचे ही आनंदाची बाब ठरली आहे.

## डांगोरली बंधारा अडचणीत

**गोंदिया:** जवळपास २५ हजार एकर क्षेत्राला बारमाही सिंचन तसेच गोंदिया शहराला २४ तास पिण्याच्या पाण्याची सोय करणारा डांगोरली बंधारा आज अडचणीत आला आहे. त्यामुळे नियमित पाठपुराव्याची आता कामांना गरज असल्याचे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी सांगितले.

मध्यप्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्यांसाठी वरदान ठरणाऱ्या डांगोरली बंधारा तसेच क्षेत्रातील शेतकरी व सामान्य जनतेसाठी महत्वपूर्ण असलेल्या विकासकामांच्या अडचणीत असलेल्या स्थितीबाबत पत्रकारांसोबत ते बोलत होते. याप्रसंगी अग्रवाल यांनी डांगोरली बंधाऱ्यासाठी ऑगस्ट २०१९ मध्ये मंजुरी मिळाली होती. मात्र पाठपुरावा न झाल्याने साकडी-डांगोरली येथे रद्द केलेल्या पुलाचे काम सुरु झाले आहे.



**निधी परत गेल्याने अडचणीत वाढ**

वाघ नहर दुरुस्ती, पिंडकेपार जलाश प्रकल्प, रजेगाव-काटी उपसासिंचन, तेढवा-शिवनी उपसा सिंचन व नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनांचे सुमारे ६५ कोटी रुपये परत गेल्याने या योजनाही अडचणीत आल्याचे सांगितले. याप्रसंगी त्यांनी शहरातील पश्चिम बायपास, सिंचन भवन, महिला बाल विकास भवन, पॉलिटेक्निक कॉलेजमधील २ नवे अभ्यासक्रम व आयटीआय पुर्ननिर्माणकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले.

**उड्डानपुलासाठी ८२ कोटी**

शहरातील जुन्या उड्डाणपुलाच्या विषयावर बोलतांना त्यांनी उड्डाणपुलासाठी ८२ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. मात्र आता राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याची गरज असल्याचे सांगितले. नागरा बायपाससाठी ३ वर्षापुर्वी एक कोटीचा निधी डीपीसीसीतून उपलब्ध करण्यात आला आहे. मात्र आता नव्याने या योजनेसाठी जोर लावावा लागणार, असेही ते म्हणाले.

## संपादकीय

# राज्य महिला आयोग वाऱ्यावर

हाथरस प्रकरणावरुन सध्या महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्षांनी सोयीचा राजकीय धुमाकुळ सुरु केला आहे. प्रत्येकजण आपल्या सत्ताकाळात महिला सुरक्षित होत्या आणि विरोधकांच्या काळात महिला अत्यंत असुरक्षित आहेत, असा दावा करीत आहे. सध्या हाथरस प्रकरणावरुन महाविकास आघाडीने उत्तर प्रदेशातील योगी सरकारवर जोरदार टीकास्त्र सुरु केले आहे, पण आपल्या दिव्याखालचा अंधार बघायला काही महाविकास आघाडी तयार नाही.

राज्याला गत सात महिन्यांपासून महिला आयोग अध्यक्षपदाची नेमणूक करण्यात आलेली नाही. आयोगाचे कामकाज महिला व बाल मंत्रालयाच्या अखत्यारीत सुरु असल्याने सध्या तरी या पदावर काँग्रेसच्या मंत्री यशोमती ठाकूर यांनी मूक दावा केल्याचे दिसते आहे. हाथरस प्रकरणावरून योगी सरकारवर टीका करणाऱ्या महाविकास आघाडीने महिला आयोग अध्यक्षपद नेमण्यात केलेल्या दिरंगाईबाबत खुद्द सरकारचा घटक असणाऱ्या काँग्रेसने आपली नाराजी जाहिर केली आहे, तर हैदराबाद पिडीता प्रकरणानंतर तावातावाने महाराष्ट्रातही "दिशा" कायद्याची अंमलबजावणी करून आणि यातील तरतुदीनुसार महाराष्ट्रातील महिलांवर अत्याचार झालाच तर त्यांना ३० दिवसांत न्याय मिळेल, अशा वल्गना करीत वेळ मारुन नेणाऱ्यांना आता काँग्रेसच्याच आशीष देशमुख यांनी "दिशा" कायदा तातडीने लागू करावा यासाठी निवेदन दिले आहे.

आपल्याच सरकारला एखादी गोष्ट तातडीने करा यासाठी पुन्हा पुन्हा आठवण करुन द्यावी यासारखे दुर्दैव ते काय! ५ फेब्रुवारी २०२० रोजी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी राजीनामा दिला, त्यानंतर जवळपास सात महिन्यानंतरही राज्याच्या महिला आयोगाचे अध्यक्षपद रिकामेच आहे. या अध्यक्षपदावर आपल्या पक्षातील महिलेची वर्णी लागावी यासाठी महाविकास आघाडीतील तीनही पक्षांचे नेते आग्रही आहेत. अर्थातच यात राष्ट्रवादीच पुन्हा बाजी मारणार हे स्पष्ट आहे. कोरोना संकटाच्या काळातही घरगुती हिंसाचार, कार्यालयस्थळी लैंगिक छळ, महिलांवरील अत्याचाराच्या अनेक घटना तसेच कोव्हिड उपचार केंद्रातही अनेक महिलांवर लैंगिक अत्याचाराच्या घटना समोर आल्या आहेत.

अशा स्थितीत महिला आयोगाची भूमिका महत्त्वाची आहे. हिंगणघाटसारख्या घटेनत अद्याप केस पुढे सरकलेली नाही, कोपर्डी प्रकरणात पुढे काय झाले ते कळाले नाही, ज्या मागणीसाठी सकल मराठा समाज एकत्र आला, ती मागणी अद्यापही पूर्ण झालेली नाही, आता तर मराठा समाजात फूट पाडण्याचे सोयीचे राजकारण खेळले जात आहे. मराठा समाजाच्या मोर्चात सहभागी झालेल्या मराठा माता-भगिनींचा अवमान करणारे व्यंगचित्र निर्लज्जपणे आपल्या मुख्यपत्रातून प्रसिद्ध करणारेच आज मराठा समाजाची आरक्षणाच्या मागणीवरून कूरचेष्टा करूपाहत आहेत आणि अवघा महाराष्ट्रातील मराठा समाज ज्या मराठा नेत्यांकडे अपेक्षेने बघतो आहे ते एकजात सर्व मराठा नेते या महाविकास आघाडीच्या दावणीला बांधले गेले आहेत. त्या नेत्यांना ना आपल्या माता-भगिनींच्या अपमानाची खंत आहे, ना जणीवपूर्वक हिसकावून घेतलेल्या आरक्षणाबाबत खेद आहे. राज्यातील महिला अत्याचाराबाबत ही सर्वच नेते मंडळी फारशी आग्रही नाहीत, हेच तर दुर्दैव आहे. राष्ट्रीय गुन्हे अण्वेषण विभागाने आजवर प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही वर्षाच्या आकडेवारीत गुन्हेगारीचे प्रमाण कमी होताना आढळलेले नाही, तर दर वर्षी आणि प्रत्येक मिनिटागणिक महिला, बालिका अत्याचारांत वाढच झालेली आहे. या अत्याचारामागे अनेक कारणे आहेत. कठोर कायदे करण्याची आणि तातडीने पोलीस संरक्षण देण्याबाबत कटीबद्धता राखण्यात राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आजवर दिसून आला आहे.

सोशल मीडिया, इंटरनेटचा वाढता वापर आणि त्याचा प्रभाव, लॉकडाऊनमध्ये वा त्याआधीही सहजपणे एका क्लिकवर अनुभवता येणारी नग्नता, त्यासाठी फुकटात उपलब्ध होणारे मोबाईल डेटा प्लॅन, अशा कारणांची जोडही या गुन्हेगारीला मिळते आहे. दिवसागणिक महिला अत्याचाराच्या संख्येत वाढ होत आहे, इतकेच नाही तर यातील कूरता अवाक करणारी आहे. सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे अशा गुन्ह्यांत अल्पवयीनांचे प्रमाण दखलपात्र ठरत आहे. दिल्लीत २०२१२ मध्ये घडलेल्या निर्भया प्रकरणांनतर प्रत्येक राज्याला स्वतंत्र निर्भया फंड राखीव ठेवण्याचा निर्णय झाला. या फंडातून पीडितेवर उपचार, कायद्याचे मार्गदर्शन, तिचा उदरनिर्वाह, पालनपोषण, यासोबतच अत्यंतिक तणावाच्या घटनेत तिच्या निवासाची सोय आदी पातळीवर अत्याचारीत पीडितेला मदतीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र गतवर्षी डिसेंबरमध्ये लोकसभेमध्ये प्रश्नोत्तर तासात अनेक राज्यांनी त्यांना महिला सुरक्षिततेसाठी मिळालेला निर्भया फंड पुरेसा खर्च केला नसल्याची माहिती उघड झाली आहे. तर काही राज्यांनी एक रुपयाही खर्च न केल्याचे दिसून आले आहे. ज्या राज्यांनी निर्भया फंडामधील रक्कम वापरलेली नाही त्यामध्ये महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, सिक्कीम, त्रिपुरा, दमण व दीव यांचा समावेश आहे.

तर महाराष्ट्र, दिल्ली, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, कर्नाटक, झारखंड, राजस्थान, प. बंगाल, दादरा नगर हवेली, गोवा या राज्यांना महिला हेल्पलाईनसाठी निधी दिला होता तो निधीही या राज्यांनी खर्च केलेला नाही. ते पैसे सरकारी तिजोरीत तसेच पडून आहेत. केंद्राने निर्भया फंडसाठी सुमारे ३ हजार कोटींची तरतूद केली आहे. त्यापैकी २०१९ अखेरपर्यंत जेमतेम २५२ कोटी रुपयेच खर्च झाले आहेत. महाविकास आघाडीने त्यांच्या पहिल्या विधानसभेत निर्भया फंडपैकी २६ कोटी रुपये खर्च करून राज्यातील महिला अत्याचाराचा तपास करणाऱ्या फॉरेन्सिक लॅबना अधिक सशक्त करण्यासाठी वापरणार असल्याचे जाहीर केले होते. (नॅशनल क्राईम रेकॉर्डस ब्यूरो) एनसीआरबीच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी महाराष्ट्रात ३७ हजार १४४ गुन्हे नोंद केले गेले. महिलांविरोधी गुन्ह्यांचे देशाचे सरासरी प्रमाण (दर लाख लोकसंख्येमागील गुन्हे) ६२.४ इतके आहे. महाराष्ट्रातील प्रमाण ६३.१ आहे. बलात्कार-हत्येपाठोपाठ महिलांना विविध कारणांनी आत्महत्येस प्रवृत्त करण्यातही महाराष्ट्र आघाडीवर आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्रात ८०८, उत्तर प्रदेशात ३५९ आणि राजस्थानात १८६ महिलांना आत्महत्या करण्यासाठी भाग पाडण्यात आले. २०१८ मध्ये महाराष्ट्रात ९०० महिला-तरुणींनी दबावाला बळी पडून आत्महत्या केल्या होत्या. लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्यानुसार नोंद गुन्ह्यांचे प्रमाण महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. देशात दर लाख लोकसंख्येमागे सरासरी सात गुन्हे घडतात, तर महाराष्ट्रात ११, अशी नोंद "एनसीआरबी' अहवालात आढळते. विविध कारणांसाठी अपहरण, विनयभंग, हुंड्यासाठी छळ या गुन्ह्यांमध्येही महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी आहे. "एनसीआरबी' या अहवालानुसार २०१९ अखेरीस महाराष्ट्रात महिलांविरोधी गुन्ह्यांशी संबंधित दोन लाख सात हजार (९४ टक्के) खटले प्रलंबित आहेत. "एनसीआरबी'ने देशातील १९ महानगरांमधील गुन्हेगारीचा आढावा घेतला असून त्यात महाराष्ट्रातील मुंबई, नागपूर आणि पुणे शहरांचा समावेश आहे.

महिलांविरोधी गुन्ह्यांत दिल्ली पहिल्या क्रमांकावर (१२ हजार ९०२), तर मुंबई दुसऱ्या क्रमांकावर (६ हजार ५१९) आहे. नागपूर शहरात ११४४ गुन्हे नोंद झाले. नागपूरचे गुन्हे प्रमाण मुंबईपेक्षा जास्त आहेत. ही आकडेवारी जाहीर होत असतानाच हाथरस बलात्कार प्रकरणावरून देशभरात संतापाची लाट उसळली असताना महाराष्ट्रातील महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. अध्यक्षांच्या नियुक्तीसंदर्भात मुख्यमंर्त्यांसह इतर मंत्र्यांना आतापर्यंत आठ ते दहा पत्रे दिली. मात्र अद्यापही अध्यक्षाची नेमणूक झाली नसल्याची खंत राज्याच्या महिला व बालविकासमंत्री यशोमती ठाकूर यांनी आपल्याच सरकारबाबत व्यक्त केली आहे. आपल्याच घटकपक्षांची नाराजी लक्षात घेवून तरी राज्याला गरजेचे असणारे महिला आयोग अध्यक्षपद नजीकच्या काळात नेमले जाईल, अशी आशा करुयात.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# पेटी कॉन्ट्रक्टर रहांगडाले म्हणतोय सरपंचच मुख्य ठेकेदार

## ■ कटंगीतील सिमेंट रस्ता बांधकाम गुणवत्तेवरच प्रश्नचिन्ह
## ■ सरपंचाच्या ट्रक्टरनेच झाली रेतीची वाहतुक



**गोंदिया:** गोरेगाव तालुक्यातील कटंगी येथे ग्राम पंचायतीच्या माध्यमातून सिमेंट रस्ता बांधकाम सुरू आहे. या बांधकामावर शासनाच्या आदेश नसतांनाही चुरीचा वापर होत आहे. तर दुसरीकडे याच प्रकरणाला घेऊन सरपंच व गोरेगावचे नायब तहसीलदार यांच्यातील प्रकरण चांगलेच गाजत आहे. अशातच या बांधकामाला घेऊन ग्रामवासीयांमध्ये विविध चर्चांना पेव फुटले आहे. एकंदरीत या कामाची चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणीही समोर आली आहे.

सविस्तर असे की, गोरेगाव तालुक्यातील कटंगी येथे ग्राम पंचायतीच्या माध्यमातून सिमेंट रस्ता बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी लागणारे साहित्य ज्यामध्ये रेती ही लगतच्या मध्यप्रदेश राज्यातील आणली जात आहे, तर दुसरीकडे शासकीय आदेशात सिमेंट रस्ता बांधकामात चुरीचा वापर करु नये, असे असतांना त्या बांधकामात चुरीचा वापर होत असल्याचे दिसून आले आहे. या बाबत संबंधित विभागाचे अभियंता प्रविण दमाहे यांना विचारणा केली असता, त्यांनी बांधकामात चुरीचा वापर करता येऊ शकत नाही, असे सांगितले. तर दुसरीकडे रेतीच्या नावावर गोरेगावचे नायब तहसीलदार रहांगडाले यांनी आपल्याला ५० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार सरपंच हरिणखेडे यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. एकंदरीत बांधकामात वापण्यात येणारी चुरी तर दुसरीकडे रेती वरून उठलेले वादळ यामुळे हे बांधकाम चांगलेच चर्चेत आले आहे. त्यामुळे या कामाची चौकशी करून सत्य प्रकरण समोर आणावे, अशी मागणी गावातील सुज्ञ नागरिकांनी केली आहे.त्यातच जे पेटी कॉन्ट्रक्टर रहांगडाले हा काम करीत आहेत,त्यांना विचारणा केल्यावर सदर काम आपण सरपंचाकडून विकत घेतल्याचे सांगत मुख्य कंत्राटदार सरपंच असल्याचे सांगितले.सोबतच सरपंचाच्या मालकीच्याच ट्रक्टरने रेतीची वाहतूक सुध्दा बांधकामाच्या ठिकाणी करण्यात येत होती.जेव्हा की लाभाच्या पदामध्ये लोकप्रतिनिधीला आपलेच काय कुटुबियांच्या नावे असलेल्या कुठल्याही वाहनाचा वापर किंवा त्यांचे नावे काम करता येत नाही परंतु याठिकाणी चक्क सरपंच यांचेच ट्रक्टर रेतीची वाहतूक करीत असल्याने त्या नियमाचा सुध्दा भंग झाल्याचे दिसून आले.

### शासनाच्या महसूलाला चूना

जिल्ह्यातील रेती घाट बंद आहेत, अशात जिल्ह्यातील रेती घाटातून रेतीची उपसा अथवा वाहतूक करणे गैर आहे. मात्र अनेक कामावर मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट जिल्ह्यातील रेती येत असल्याचे समोर आले आहे. कटंगी येथील कामावरही बालाघाट येथील रेती असल्याची रॉयल्टी आहे. मात्र ज्या तारखेची रॉयल्टी आहे, त्या तारखेला ती रेती आली का? व रॉयल्टीमध्ये जेवढी रेती आहे, त्यापेक्षा अधिक पुरवठा तर झाला नाही, हा ही चौकशीचा विषय असून या बांधकामावर सरपंचाच्या वाहनाने रेती बांधकाम परिसात नेत असल्याचेही दिसून आले आहे.स्वतःट्रक्टरचालकाने यासंदर्भात माहिती देत २० सप्टेंबरला रेती आल्याचे सांगितले.जेव्हा की रॉयल्टीची तारीख ही १४ सप्टेंबर दाखवत आहे.यावरुन गोंधळ दिसून येतो सोबतच टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा अधिक रेतीची वाहतूक झाल्याचेही निदर्शनास येत आहे.

# जि.प.निवडणुकीसंदर्भात कार्यकर्त्यांशी चर्चा



**गोंदिया:** खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निर्देशानुसार माजी आमदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प. क्षेत्र धापेवाडा, दवनीवाडा व एकोडी येथे येणाऱ्या जि.प. निवडणुकीसंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली.

बैठकीला विनोद हरिणखेडे, कुंदन कटारे, बालकृष्ण पटले, रजनीकांत बोपचे, गणेश बरडे, सुनील पटले, अखिलेश सेठ, कृष्णकुमार जायस्वाल, नितीन टेंभरे प्रामुख्याने उपस्थित होते. धापेवाडा येथे झालेल्या चर्चेप्रसंगी डॉ. प्रदीप रोकडे, देवलाल कटरे, तुलशीकुमार बघेले, आरजू मेश्राम , कान्हा बघेले, कृष्णा ठकरेले, रामेश्वर ठकरेले, निरज उपवंशी, योगेंद्र भाद्रे, श्यामराव बानेवार, कुवरलाल येरणे, कारूलाल रहांगडाले, भोजराज रहांगडाले, इसुलाल कवरे, फत्तुसिंग नैकाने, मोरेश्वर नागपुरे, सुरेंद्र नागपुरे, मनोज पटले उपस्थित होते. दवनीवाडा येथे घनश्याम कस्करे, चेतना पटले, नरहरप्रसाद मस्करे, दुलीचंद चौरीवार, धर्मराज कटरे, अशोक डोंगरे, रामेश्वर लांजेवार, मनिराम राऊत, राजाराम बागडे, वीरेंद्र गजभिये तर एकोडी येथे रवी पटले, हितेश पतहे, गोविंद बावणकर, नागोराव लिचडे, रामा क्षिरसागर, बेनीराम गावडे, मोनू शेख, भाऊदास चव्हाण, कुरेश चौधरी, गोविंद लिचडे, मधुकर बावणकर, धर्मराज पटले, धनराज पतहे उपस्थित होते. कामठा येथे झालेल्या बैठकीप्रसंगी मनोज दहीकर, विजय रहांगडाले, महेश मस्करे, हमीदभाई कुरैशी, विजय लिल्हारे, लिखीराम तुरकर, एस.आर. रहांगडाले, टेकलाल तुरकर, शंकर गौतम, प्रेमलाल बिसेन, जियालाल रहांगडाले, शोभेलाल खैरवार, भारध्वज बिसेन, गणेश गणवीर, कोमलकुमार नंदागवळी, कुवरलाल आसोले, भैयालाल भेलावे तर पांजरा येथे गंगाराम कापसे, लक्ष्मीनारायण मेश्राम, माहुले, छविंद्र नागपुरे, सुधराम बाहे, मारोती शिवणकर, कुलेश भर्रे, जिवनलाल पाचे, गणुलाल बिसेन, मयाराम कोकोडे, लक्ष्मी बिसेन, डाहारे व लांजेवार उपस्थित होते.

# ओबीसी कर्मचारी संघटनेने दिले मराठा आरक्षणविरोधात निवेदन



**तिरोडा** : राज्यात मराठा समाजाने ओबीसी आरक्षणात समावेश करण्याच्या मागणीला केलेल्या भूमिकेचा विरोध करण्यासाठी ओबीसी संघर्ष कृती समिती व राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी महासंघ तिरोडा शाखेच्यावतीने आज ५ ऑक्टोबरला मराठा समाजाचा ओबिसी संवर्गात समावेश न करण्याबाबतचे निवेदन तहसिलदारामार्फत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व बहुजन मंर्त्यांना पाठविण्यात आले. निवेदन देतेवेळी याप्रसंगी डी.एच. चौधरी, ए.डी.शरणागत, एम.आर. पारधी, नोकलाल शरणागत,टि.के. बोपचे, के.जे. हरिणखेडे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# कातुर्ली ग्रामपंचायतीच्यावतीने दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेश वाटप



**आमगाव** :- तालुक्यातील ग्राम पंचायत कातुलीअंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. ग्राम पंचायतच्या पांच टक्के राखीव निधीतून विहित वेळ देऊन शासन निर्णयतील तरतुदीनुसार लाभाथी यांना सहाय्यभूत उपकरणे तसेच नविन शासन निर्णय नुसार लेौंळव १९ लॉक डाउन परिस्थितीत खाद्यान्न वस्तु खरेदी करणे करीता सहायक अनुदान स्वरुपात रुपये एक हजार याप्रमाणे एकूण ३५ लाभाथी यांना पस्तीस हजार रुपये सरपंच केशरी बिसेन व सचिव कमलेश बिसेन यांचे हस्ते वितरित करण्यात आले. त्याचप्रमाणे नियोजन आराखड्यात तरतूद केले प्रमाणे माझे कुटुंब माझी जबाबदारी सर्वेक्षण करीता थर्मल गण व ऑक्सिमिटर खरेदी करून देण्यात आले.

प्राथमिक उपकेंद्राकरीता पॅड, डिस्पोजल मशीन तरतुदीनुसार खरेदी करून देण्यात आल्याची माहिती सचिव कमलेश बिसेन यांनी दिली. यावेळी सदर कार्यक्रमाला उपसरपंच रामलाल धोंडू दोनोडे,ग्रा. प. सदस्य सर्वश्री. चुनीलाल तानु शहारे, भागवत हरीचंद बिसेन, अर्पणकुमार ढेकूलदास रामटेके, सौ.प्रीती विजय कोरे, सौ.ज्ञानवता राजेश शिवणकर, सौ.प्रमिला धनलाल जैतवार, सौ.रंजना कलतलाल फरकुंडे , सौ.पुस्तकला तेजराम भेलावे, हिरालाल लक्ष्मण बिसेन,मूर्ति भेमराज गौतम,राजकुमार झाडू भेलावे,नितेमन तुळशीराम बिसेन उपस्थित होते..

# शिक्षकांच्या हक्कासाठी नवनियुक्त सीईओ डांगेना शिक्षक भारतीचे निवेदन



**गोंदिया** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारती संघटनेच्यावतीने नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे यांचे स्वागत करुन भारताचे संविधान व अभिनंदन पत्र देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी जिल्ह्यातील शिक्षक बांधवांच्या विविध प्रलंबित समस्यांचे निवेदनही देत समस्यांवर चर्चा करण्यात आली.शिक्षक भारतीच्या पदाधिकाऱ्यांसोबत सभा लावून तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीपकुमार डांगे यांनी शिक्षक भारतीच्या शिष्टमंडळाला दिले.

निवेदनात शिक्षकांचे दोन वर्षापासून प्रलंबित असलेले कायमचे प्रकरण निकाली काढणे ,शिक्षकांची यादी प्रकाशित करून समुपदेशनातून तत्काळ रिक्त पदे भरणे,विषय शिक्षकांना वेतनश्रेणी लावणे, प्रलंबित निवडश्रेणी व चट्टोपाध्याय प्रकरणाची दुसरी यादी प्रकाशित करणे, डीसीपीएस, जीपीएफ कपातीच्या आजपर्यंतचा हिशोब देणे , डीसीपीएस मृत शिक्षकांना शासन निर्णयानुसार दहा लक्ष रुपयांची मदत देण्यात यावी, नक्षल भत्ता पंधराशे रुपये लागू करणे व थकबाकी काढणे, मृत डीसीपीएस बांधवांच्या कुटुंबीयांना केंद्राप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन योजना लागू करणे, १४ व्या वित्त आयोगातून शाळेचे विज बिल भरण्यात यावे, संगणक अर्हता विहित मुदतीत सादर न केलेल्या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची वसुली रक्कम परत देऊन आता सेवानिवृत्त होत असलेल्या शिक्षकांची संपूर्ण रक्कम परत करावी इत्यादी मागण्यांचा समावेश आहे.यातील बहुतांश मागण्या निकाली काढल्या जातील असे आश्वासन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिष्टमंडळाला दिले.

शिष्टमंडळात शिक्षक भारतीचे विभागीय अध्यक्ष प्रकाश ब्राह्मणकर, विभागीय उपाध्यक्ष गुलाब मौदेकर, राजु टेंभरे, पी.डी. चव्हाण, संतोष डोंगरे, संतोष बारेवार, फुलचंद पारधी, रामभगत पाचे, नलिनी नागरीकर, संतोष मेंढे, श्याम बावणे, लक्ष्मी ढेकवार आदींचा समावेश होता.

# मोहाडी पंचायत समितीसमोर शिवसेनेचे उपोषण सुरू



**मोहाडी** : मग्रारोहयो योजनेच्या कामात करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी, या आशयाचे निवेदन मोहाडी पंचायत समितीला वारंवार दिल्यानंतरही चौकशी न करता भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घातल्यामुळे पंचायत समिती मोहाडी समोर शिवसेनेचा वतीने आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

ग्रामपंचायत करडीद्वारे करण्यात आलेल्या पांदन रस्त्याचे तसेच नहराच्या पाळीचे काम मग्रारोहयो योजनेअंतर्गत करण्यात आले. परंतु या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता करण्यात आली असल्याची तक्रार शिवसेना तालुका प्रमुख सार्वे यांनी अनेकवेळा केली होती. तसेच या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, यासाठी दि. १४ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारासुद्धा देण्यात आला होता. परंतु गटविकास अधिकारी मोहाडी यांनी मध्यस्थी करून २० दिवसात सदर कामाची चौकशी करण्याचे आश्वासन दिल्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले होते. परंतु, या २० दिवसात गटविकास अधिकारी मोहाडी यांनी प्रकरणाची गंभीरतेने दखल घेतली नाही व भ्रष्टचारी लोकांना पाठीशी घालण्याचे काम केले. म्हणून प्रशासनाला जाग येण्यासाठी शिवसेनेतर्फे आमरण उपोषण सुरूकरण्यात आले आहे

# आशासेविकांना नगरपरिषदेने दिले प्रोत्साहन निधी

**गोंदिया** : कोवीड-१९ च्या संसर्गात घराघरापर्यंत जाऊन तपासणी व रोगाबद्दलची माहिती देण्यासाठी सतत कार्यरत असलेल्या नगरपरिषद क्षेत्रातील आशासेविकांना प्रोत्साहनपर भत्ता म्हणून २००० रुपयाचा निधी प्रत्येकी देण्यात आला आहे.नगरपरिषदेचे मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांनी याकरीता पुढाकार घेत ५८ आशाताईकरीता १ लाख १६ हजार रुपयाच्या निधीचे धनादेश गोंदिया तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालयास सोपवलि.दिवाळीपुर्वी पुन्हा आशाताईना प्रत्येकी २००० रुपयाचा प्रोत्साहन निधी देण्यात येणार असल्याची माहितीही मुख्याधिकारी चव्हाण यांनी दिली आहे.

# राष्ट्रीय शिक्षा नीतीच्या विरोधात प्रधानमंत्र्यांना निवेदन सादर



**गोंदिया:-** राष्ट्रीय शिक्षा नीती विरोधी आंदोलन समन्वय समिति तर्फे राज्यात तालुका स्तरावर नवीन शैक्षणिक धोरणाचे विरोध करण्यात आले. गोंदिया जिल्हा समन्वय समिती तर्फे जिल्ह्यातील गोंदिया, आमगाव, गोरेगाव, देवरी व सडक अर्जुनी तालुक्यात माननीय तहसीलदार मार्फत प्रधानमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात असे म्हटले आहे की , ही नीती केंद्राद्वारे राज्याच्या प्राप्त अधिकाराबाबत हस्तक्षेप करीत असल्याने राज्याला केंद्रावर अवलंबून राहावे लागेल. यामुळे जातीय दृष्टिकोनातून मागासलेल्या जातींना शिक्षणापासून वंचित राहावे लागेल. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षण महागडे होईल आणि त्यामुळे पालकांचे आर्थिक शोषण होईल. स्त्री पुरुष असमानता वाढेल आणि शिक्षण नीती मध्ये सनातन परंपरेला आदर्श मानल्याने विद्यार्थी आधुनिक व तार्किक शिक्षणाला मुकतील.

प्रारंभीक बाल्या अवस्थेतील निगा आणि शिक्षण (एउउए ) अंतर्गत पहिले ३ वर्षे आंगणवाडी व पहिली व दुसरीचे दोन वर्षे शिकविण्याकरिता ६ महीने कोर्स केलेल्या शिक्षकांना नियुक्त करताना त्यांच्या सेवशर्तीचा कुठेही उल्लेख नाही. विभिन्न देशात जेथे शिक्षकाना दिल्या जाणाऱ्या नोकरी व पगाराचे संरक्षण असते तसे या नीतीत कुठेही उल्लेख नाही. तसेच शिक्षकांच्या सेवेत संविधानिक आरक्षणाची तरतूद ही नाही.

वर्ग ८ वी पर्यंत मायबोलीतून शिक्षणाचा आग्रह ही नीती करीत असल्याने सरकारी शाळात शिकणारे विद्यार्थी इंग्रजी भाषेतील दिल्या जाणाऱ्या शिक्षणापासून वंचित राहतील.

६ वी ते ८ वी ला व्यवसायिक शिक्षणांचे नावाखाली पारंपरिक व्यवसायाचे शिक्षण देऊन सरकारी शाळात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अकुशल/कुशल कारागीर बनविण्याची प्रक्रिया या नितीत आहे. स्कूल कॉम्प्लेक्स ची निर्मिती करून ही शिक्षण धोरण अतिदूर व खेडोपाड्यात असणाऱ्या शाळा बंद पडून ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित करूपाहते. उच्च शिक्षणामध्ये स्वायत्ता च्या नावाखाली उच्च शिक्षण सामान्याना न परवडण्याचे करून उच्च शिक्षकणापासून त्यांना वंचित करू पाहते. खाजगी शिक्षण संस्थेत भारतिय संविधानात नमूद शैक्षणिक आरक्षणाची तरतूद नसून शासनाच्या तर्फे दिल्या जाणाऱ्या फेलोशिप अथवा स्कॉलरशिप चा ही उल्लेख नाही.

भारतातील लोकसंख्येचा अर्धा भाग असूनही स्त्री शिक्षणाचे विस्तृत विवरण या नीती मध्ये नाही. या नीती नुसार सरासरी १०० विदेशी विद्यापीठे भारतात येऊन आपले विद्यापीठ चालवितील , ज्यांचे शुल्क ठरविण्याचे अधिकार त्यांचेकडे सुरक्षित असतील, याचा परिणाम शिक्षणाचे व्यापारीकरण करण्यामध्ये होईल. संक्षेपाने ही नीती सर्व स्तरावरील जनतेच्या हिताविरुद्ध आहे. निवेदन देताना राष्ट्रीय शिक्षा नीती विरोधी आंदोलन समिति तालुका गोंदिया च्या वतीने जिल्हा समन्वयक अतुल सतदेवे, प्रा. डी.एस. मेश्राम, एम.कठाणे, तालुका समन्वयक सुनिल भोंगाडे, रवि भांडारकर, तालुका आमगाव च्या वतीने जिला संयोजक विनायक येडेवार, योगेश रामटेके, मिलिंद पंचभाई, सावन कटरे, संजय बोहरे ,उल्हास तागडे, लोकेश लांडगे ,निलेश चौधरी, जितेंद्र साखरे, गोरेगाव तालुक्यातुन समन्वयक प्रा.सचिन नांदगाये व संयोजक पंकज मेश्राम यांचेसह मयुर वालदे, अजय वालदे, प्रणय राऊत, भावेश फाये, कृणाल नन्देश्वर, तुषार डोंगरे, उज्वल शहारे, शुभम मेश्राम, वीरेंद्र नन्देश्वर, निरोप मेश्राम, देवरी तालुक्यातून तालुका समन्वयक आनंदराव सतदेवे, हेमंत भन्डारकर, आर.एच. वाघाडे, वाय.बी. धुर्वे, आर.बी. बारसे, सडक अर्जुनी तालुक्यातून तालुका समन्वयक सुनील भीमटे, नंदकिशोर वैदय, विलास कोटांगले, जी.सि. पटणे, मंगेश भोंडे यानी तहसिलदार मार्फत प्रधानमंत्र्यांना निवेदन सादर केले.

# शेतकरी कायदा व हाथरस घटनेविरोधात काँग्रेसचे जिल्ह्यात आंदोलन



**गोंदिया :** केंद्र सरकारने नुकतेच तीन कृषी विषयक विधेयक पारित केले आहे. हे विधेयक शेतकरी आणि शेतमजूर विरोधी असून ते रद्द करण्यात यावे या मागणीला घेवून जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने शुक्रवारी (दि.२) येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर बैलबंडी मोर्चा काढण्यात आला. तसेच केंद्र सरकारच्या धोरणाचा काँग्रेस कार्यकर्त्यांनी यावेळी डफली वाजवून नोंदविला.शुक्रवारी दुप–ारी १२ वाजता फुलचूर चौकातून काँग्रेसच्या बैलबंडी मोर्चाला सुरुवात झाली. या मोर्चात काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

जिल्हा काँग्रेस कमिटीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीच्या पार्श्वभूमीवर किसान व मजूर बचाव दिवस पाळत या मोर्चाचे आयोजन केले होते. शेतकरी बचाओ, कृषी विधेयक रद्द, केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध नोंदविणारे फलक घेवून कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध नोंदविला. त्यानंतर फुलचूर चौकातून बैलबंडी मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर हा मोर्चा जयस्तंभ चौकातील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर पोहचला. या ठिकाणी काँग्रेस कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या धोरणाचा डफली वाजवून निषेध नोंदविला. या मोर्चाचे नेतृत्त्व काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष डॉ. नामदेव किरसान, प्रदेश सचिव अमर वराडे, विनोद जैन, जितेश राणे यांनी केले. या वेळी विविध मागण्यांचे निवेदन राष्ट्रपतींच्या नावे उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते यांना निवेदन देण्यात आले. मोर्चाच्या यशस्वीतेसाठी महिला काँग्रेस, किसान काँग्रेस, सेवा दल, ओबीसी विभाग, अनु.जाती विभाग, असंघटित मजदूर काँग्रेस,



युथ काँग्रेस, एनएसयुआयचे कार्यकर्ते व नीलम हलमारे, सुर्यप्रकाश भगत, डॉ.संजीव ठकरेले, सुशील खरकाटे, प्रशांत लिल्हारे, नटवरलाल गांधी, विजेंद्र बरोडे, अमित भालेराव, जीवन शरणागत, चंद्रशेखर बगडे, प्रभा उपराडे, वंदना काळे,अजय रहांगडाले,अमर राहुल, ममता पाऊलझगडे, आलोक मोहंती यांनी सहकार्य केले.

**आमगाव :** देशाचा पोशिंदा बळीराजाला उध्वस्त करणारा कायदा केंद्र सरकारने ताबडतोब मागे घ्यावा या सह विविध मागण्यांसाठी आमगाव तालुका काँग्रेसने शुक्रवारी बैल बंडी मोर्चा काढून केंद्र सरकारचा निषेध नोंदविण्यात आला.मोर्चाचे नेतृत्व गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव ईसुलाल भालेकर, तालुका काँग्रेस अध्यक्ष संजय बहेकार, तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा सौ छबुताई उके, शहर काँग्रेस अध्यक्ष अजय खेतान, यांच्यासह जेष्ठ पदाधिकाऱ्यांनी केले. हा मोर्चा देवरी रोड वरील काँग्रेस कार्यालयातुन काढण्यात आला. बैलबंडी मोर्चा आंबेडकर चौक ते महात्मा गांधी चौक पासून तहसील कार्यालयात पोहचला.

**अर्जुनी–मोर:** अर्जुनी मोरगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने कृषी व कामगार विधेयकाविरोधात तसेच हाथरस येथील तरुणी मनीषा वाल्मिकी बलात्कार व खून याप्रकरणी नवेगावबांध येथील टी पॉईट चौकात धरणे आंदोलन आज २ ऑक्टोंबरला करण्यात आले. भाजपाप्रणीत काँग्रेस सरकार विरोधात नारेबाजी करून निषेध नोंदविण्यात आला.

तालुका काँग्रेस अध्यक्ष भागवत नाकाडे, असंघटित कामगार सेलचे अध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर ठवरे, अनुसूचित जाती सेलचे अनिल दहिवले, किसान आघाडीचे अध्यक्ष डॉ.देवाजी कापगते, गिरीश पालीवाल, विशाखा साखरे, इंद्रदास झिल्पे, यांनी केंद्र सरकारच्या शेतकरी व कामगार विरोधी धोरणांचा निषेध केला.

**देवरी:–** तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मोदी सरकारने पारित केलेल्या कृषिविषयक विधेयकाच्या विरो–धात निषेध आंदोलन आमगाव



विधानसभा मतदारसंघाचे आमदार सहसराम कोरोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. आंदोलनांतर तहसिलदारांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संदीप भाटिया, राधेश्याम बगडिया, ओमप्रकाश रामटेके, प्रशांत संगीडवार, जीते भाटिया,उषाताई शहारे, सीमा कोरोटे, शुभद्राताई, जीवन सलामे, बळीराम कोटवार, चैनसिंग मडावी, सोनू नेताम, शकील कुरेशी, अविनाश टेंभरे, अमित तर्जुले, वैभव जैन, नर्मदा महाराज, ओमराज बहेकार, छगनलाल मुंगणकर, कुलदीप गुप्ता, रोशन भाटिया, प्रशांत कोटांगले यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते

**या आहेत प्रमुख मागण्या**

केंद्र सरकारने पारित केलेले तिन्ही कृषी विधेयक रद्द करा.शेतकरी व शेतकरी विरोधी विधेयके श्रमिक विरोधी विधेयक रद्द करा.एअर इंडिया, एल.आय.सी, बँकासह सार्वजनिक उपक्रम विकण्यास विरोध.हाथरस येथील पीडितेला न्याय देण्यात यावा.शेतकरी आणि सर्वसामान्य विरोधी धोरणे केंद्र सरकारने मागे घ्यावीत.



**गोरेगाव:** येथील तहसील कार्यालयासमोर काँगेसच्यावतीने तालुकाध्यक्ष डेमेंद्र रहांगडाले यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन देत कृषी विधेयक व हाथरस घटनेचा निषेध नोंदविण्यात आला. आंदोलनात माजी सभापती पी.जी.कटरे, सी.टी. चौधरी, गुड्डू बोपचे, मलेशाम येरोला, राहूल कटरे, जगदीश येरोला, सुरेश चन्ने आदि उपस्थित होते.

## खरीप धानाच्या दरात प्रती क्विंटल ५३ रुपयांची वाढ



**गोंदिया :** शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी शासकीय धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून धान खरेदी केली जाते. २०२०–२१ च्या खरीप आणि रब्बी हंगामासाठी शासकीय धान खरेदीचे दर शासनाने निश्चित केले आहे. अ दर्जाच्या धानाला १८८८ रुपये, तर सर्वसाधारण धानाला १८६८ रुपये प्रति क्विंटल दर निश्चित केला आहे. मागील वर्षीच्या तु–लनेत यंदा केवळ धानाच्या दरात प्रति क्विंटल केवळ ५३ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. ही वाढ फारच तुटपुंजी असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर आहे.

जिल्ह्यात सर्वाधिक १ लाख ९९ हजार हेक्टरवर यंदा धानाची लागवड करण्यात आली आहे. धान हेच या भागातील प्रमुख पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये, खासगी व्यापाऱ्यांकडून त्यांची लूट होवू नये यासाठी जिल्ह्यात मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळातंर्गत धान खरेदी केली जाते. गत खरीप आणि रब्बी हंगामात मार्केटिंग फेडरेशनने ५७ लाख क्विंटल धान खरेदी खरेदी केली होती.

गतवर्षी सर्वसाधारण धानाला १८१५ आणि अ दर्जाच्या धानाला १८३५ रुपये दर शासनाने जाहीर केला होता. तर यंदा सर्वसाधारण धानाला १८६८ आणि अ दर्जाच्या १८८८ रुपये प्रति क्विंटल दर जाहीर केला आहे. मागील वर्षीच्या हमीभावाच्या तुलनेत यंदा सरासरी ५३ रुपये प्रति क्विंटल दरात वाढ झाली आहे.

दरवर्षी धानाच्या एकरी लागवड खर्चात वाढ होत आहे. शेतकऱ्यांना प्रति एकर धान लागवडीचा २५ ते ३० हजार रुपये येतो. तर खते, बियाणे आणि मजुरीच्या दरात वाढ होत आहे. पण त्यातुलनेत दर मिळत नाही. गतवर्षी महाविकास आघाडीने धानाला ७०० रुपये प्रति क्विंटल बोनस दिला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळाला होता. २५ ऑक्टोबरपासून जिल्ह्यात शासकीय धान खरेदीला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी तालुक्यात मक्का लागवड केली जात आहे. मक्का उत्पादक शेतकऱ्यांना योग्य हमभाव मिळावा यासाठी शासनाने मक्का हमीभाव खरेदी केंद्र सुरू केले जाणार आहे. २०२०–२१ करिता मक्का खरेदीचे दर शास–नाने निश्चित केले असून मक्याला १८५० रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला आहे.

## केव्हा होणार खाचखळग्यांनी भरलेल्या रस्त्याची दुरुस्ती

**सालेकसा:** नक्षलग्रस्त अतिसंवेदनशील असलेल्या सालेकसा तालुक्याला शासनाकडून मोठा निधी येत असतो. मात्र, हा निधी विकासकामांवर खर्च होत असल्याचे दिसून येत नाही. परिणामी, आजही या तालुक्याचा विकास खुंटलाच आहे. याचे ज्वलंत उदाहरण रस्त्यांच्या दुरवस्थेवरून देता येईल. तथापि, विकासनिधी मुरतो तरी कुठे, हा प्रश्न अनेकांना पडला आहे.नक्षलग्रस्त, आदिवासीबहुल सालेकसा तालुक्यातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. या रस्त्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. असे असले; तरी रस्त्यांच्या दुरुस्तीकडे संबंधित बांधकाम विभागासह स्थानिक लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाले आहे. साखरीटोला–हेटीटोला या रस्त्यावर नेहमी नागरिकांची वर्दळ असते. या रस्त्यावरून महिला, पुरुष, कर्मचारी, शाळकरी



मुले ये–जा करीत असतात. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच शिवारीटोला ते डोमाटोला या रस्त्यावरूनदेखील नागरिकांचे आवागमन सुरू असते.साखरीटोला–हेटीटोला या रस्त्यावर नेहमी नागरिकांची वर्दळ असते. या रस्त्यावरून महिला, पुरुष, कर्मचारी, शाळकरी मुले ये–जा करीत असतात. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच शिवारीटोला ते डोमाटोला या रस्त्यावरूनदेखील नागरिकांचे आवागमन सुरू असते.या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. गिट्टी उखडून वर आलेली आहे. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पाच ते सहा महिने लोटूनही या रस्त्याची दुरुस्ती झाली नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींसह बांधकाम विभागाचे रस्ता दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले आहे. परिणामी, एखादा मोठा अपघात घडल्यावर विभागाला जाग येईल का, असा प्रश्न परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## दर्जेदार रस्त्यासाठी नागरिकांच्या टाहो!

**आमगाव :** जिल्हा परिषद पीडब्ल्यूडी सब डिव्हिजन अंतर्गत विविध रस्त्याचे कामे केली जाते या कामांवर त्यांचे नियंत्रण नसल्याने कंत्राटदार यांना कोणत्या पद्धतीने काम केले जाते, हे माहितच नाही याचे उदाहरण नुकतीच आमगाव ते श्रावणटोली रस्ता बांधकामात दिसून आले.आमगाव येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालयांतर्गत डब्ल्यू बीएम मध्ये कामठा रोड ते माल्ही श्रावणटोली खडीकरणाचे काम मंजूर करण्यात आले . येथील कार्य ३ ऑक्टोंबर रोजी स्थानिक कंत्राटदाराकडून रस्त्याचे बांधकाम सुरू करण्यात आले.

सदर रस्ता जिल्हा निधीतून एक लक्ष रुपयाचे असे टप्प्याटप्प्याने मंजूर करण्यात आलेले आहे. येथील रस्त्यावर गिट्टी चे प्रमाण कमी प्रमाणात असुन त्यावर मुरमाच पांघरुन टाकण्यात आला आहे, इस्टिमेट नुसार रस्ता तयार करताना गिट्टी घातल्यानंतर त्यावर रोलर फिरवून



पाणी टाकणे आवश्यक आहे त्या नंतर मुरूम टाकण्यात यावी असे उपस्थित अभियंते रहांगडाले यांनी बोलून दाखविले. रस्त्याचे काम नियोजन बद्ध नसल्याची तक्रार नगरवासीयांनी केली आहे.

सदर रस्ता जिल्हा परिषद सदस्य यांच्या जिल्हा निधीतून प्राप्त झालेली आहे ग्रामीण क्षेत्रात रस्ते गायब केले जातात पण शिक्षक कॉलनीत व शहराच्या ठिकाणी अशा प्रकारचे निकृष्ट दर्जाचे रस्ते तयार केल्यास गावकऱ्यांनी प्रशासन विरोधात रोष व्यक्त केले जात आहे.म्हणूनच गावातील रस्ते एका पावसात वाहून जात असल्याचे प्रकार दिसून येतात

या प्रकरणांनी शासन निधीचा अपव्यय होत आहे त्याला जबाबदार कोण असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे ?

कामठा रोड ते माली रस्ता दर्जेदार तयार होणार का अशी चिंता व्ही. जे टेंभरे, रोशन गराडे, खेमलाल नवगोडे, आनंद सोनवाणे, फुलशिग उपराडेपी सी सरनागत, राजीव फुंडे, व्ही. सी निखारे, टी जी मस्करे, संतोष नागपुरे, अजय दोनोडे , आर जी लिल्हारे विजय रगडे, डॉ. सुरेंद्र गोंडणे , श्रावण शिवणकर, यांनी व्यक्त केली आहे.

## आरोग्य आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष करू नका–आमदार चंद्रिकापुरे



**अर्जुनी मोरगाव :–** कोरोना विषाणूची साथ सुरु असताना जनतेने आपले आरोग्य जपणे गरजेचे आहे, परंतु याबरोबरच शिक्षणाकडे मात्र दुर्लक्ष करू नका असा सल्ला अर्जुनी/मोर विधानसभा मतदार संघांचे आमदार श्री मनोहरराव चंद्रिकापुरे यांनी दिला.

ग्रामपंचायत येरंडी/दर्रे च्या नवीन इमारतीचे लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. मंचावर माजी जि.प. सदस्य किशोर तरोणे, येरंडी/दर्रेच्या सरपंच मनीषा शहारे,लोकपाल गहाणे,डॉ. प्रवीण दखने,तलाठी ए बी बिसेन, माजी पं स सदस्य प्रेमलाल गेडाम व इतर मान्यवर उपस्थित होते. आमदार चंद्रिकापुरे पुढे बोल–ताना म्हणाले की, सुमारे ७० हजार कर्मचा?यांना ऐच्छिक सेवानिवृत्ती मिळाली यावर त्यांनी दुःख व्यक्त केलं. BSNL टॉवर कुपोषित झाले असले तरी या गावात मोबाईल टॉवर उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

श्री तरोणे आणि श्री गहाणे यांनी येरंडी गावाची प्रशंसा करून ग्रामपंचायतच्या कारभारात कोणीही पुरुष नसून सर्वच्या सर्वच महिला भगिनी आहेत, हे आजच्या युगात आश्चर्य आहे, असे ते म्हणाले. यावेळी आमदार साहेबांच्या हस्ते वृक्षारोपण करून कान्होली चे सरपंच इंजि. संजय खरवडे यांचा सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक सरपंच शहारे यांनी तर संचालन शिक्षक संचित वाळवे आणि ग्रामसेवक पृथ्वीराज कोल्हटकर यांनी तर आभार उपसरपंच सोनिया वाढई यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी गावकऱ्यांनी अथक सहकार्य केले.

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ८ ऑक्टोंबरला लोकप्रतिनिधींच्या घरासमोर थाळी वाजवा आंदोलन

**नागपूर:** राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या आज २ ऑक्टोंबरला नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट पावनभूमी नागपूर येथे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत येत्या ८ ऑक्टोंबरला राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्यावतीने जिल्हाधिकारी,तहसिल कार्यालयासह आमदार व खासदारांच्या घरासमोर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



सुप्रीम कोर्टाने मराठा आरक्षणाच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाने ओबीसी समाजामध्ये हलचल निर्माण झाली असून राष्ट्रीय ओबीसी महासंघानेही मराठा आरक्षणाला ओबीसींचा विरोध नसून मराठ्यांना ओबीसी प्रवर्गात आरक्षण देऊ नये ही भूमिका महासंघाची स्पष्ट असल्याची घोषणा बैठकित करण्यात आली. झालेल्या सभेमध्ये विचारपीठावर महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, ओबीसी आयोगाचे माजी सदस्य प्रा. जवाहर चरडे, डॉ.अशोक जीवतोडे, प्रा.प्रदीप वादाफळे उपस्थित होते. या सभेत खालील मागण्यांवर चर्चा करुन आंदोलन करण्याची घोषणा करण्यात आली.

त्यामध्ये ओबीसी समाजाच्या प्रामुख्याने राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्याकडे प्रस्तावित करणाऱ्या मागण्या मांडल्या या मध्ये ओबीसी समाजाची २०२१ मध्ये होऊ घात–लेली जातिनिहाय जनगणना केंद्र सरकार करीत नसेल तर महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात जातनिहाय जनगणना करून ओबीसी समाजात न्याय द्यावा, ओबीसी समाजाला मिळत असलेल्या १९ टक्के आरक्षणा–तून मराठा समाजास कोणतेही आरक्षण देण्यात येऊ नये, ज्या जिल्ह्यांमध्ये ओबीसींना ६, ११, १४ , ९ टक्के वर्ग तीन व चार पदा करीता आरक्षण आहे अशा जिल्ह्यात ओबीसींना १९ टक्के आरक्षण देण्यात यावे, १००% बिंदूनामावली केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्वरित सुधारित करण्यात यावी, ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू करण्यात यावे, महाज्योती करिता एक हजार कोटी रुपयांची लवकरात लवकर तरतूद करण्यात यावी, ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला १००० कोटी रुपये मंजूर करण्यात यावे, ओबीसी समाजाचा एक लाख रिक्त पदाचा अनुशेष भरण्यात यावा, ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आर–क्षण लागू करण्यात यावे, ओबीसी समाजासाठी घरकुल योजना सुरू करण्यात यावी, ओबीसी शेतकरी शेतमजुरांना वयाच्या ६० वर्षानंतर पेन्शन योजना लागू करण्यात यावी, एसी, एसटी प्रमाणे ओबीसी शेतकऱ्यांना १००% सवलती वर राज्यात योजना सुरू करण्यात यावी, एससी–एसटी प्रमाणे सर्व अभ्यासक्रमास शंभर टक्के शिष्यवृत्ती लागू करण्यात यावी, ओबीसी विद्यार्थ्यांना स्वाधार योजना लागू करण्यात यावी, महात्मा फुले समग्र वांग्मय १० रुपये किमतीत उपलब्ध करून देण्यात यावे, राज्याच्या प्रत्येक तालुक्यात विद्यार्थ्यांसाठी वाचनालय सुरू करण्यात यावे, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात ओबीसी विभागाची कार्यालय सुरू करण्यात यावे या मागण्यांचा समावेश आहे.

या सभेला ओबीसी महासंघाचे पदाधिकारी शरद वानखेडे, प्रा. संजय पन्नासे, त्रिशरण सहारे, सुषमाताई भड, गुणेश्वर आरिकर, कल्पनाताई मानकर, प्रा. राजू गोसावी, डॉ. मुकेश पुडके, प्रा नितीन कुकडे, विजय मालेकर, प्रा. रमेश पिसे, प्रा शेषराव येर्लेकर, हाजी मंजूरी हक, शकील अहमद, बंडू डाखरे, डॉ. प्रा प्रकाश फेडर, किशोर घोरमाडे, राजू हिवंज, उदय देशमुख, विनोद उलीपवर, लीना कटरे, नयना झाडे, नंदा देशमुख, अनिता ठेंगरे, डॉ. श्याम चरडे, ईश्वर ढोले, नामदेव भोयरकर, मनोज चव्हाण, राजू खडसे, पंकज पांडे, रोशन कुंभलकर, मयुर वाघ, सोनिया वैद्य, विन–ोद हजारे, शुभम वाघमारे व वेगवेगळ्या जात संघटनेचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बँकांमध्ये कोरोना विषयक खबरदारीकडे दुर्लक्ष

**रावणवाडी :** कोरोना विषाणू संसर्गाने राज्यासह जिल्ह्यात उद्रेक केला आहे. कोरोना संसर्गाच्या दृष्टीकोनातून गोंदिया तालुका जिल्ह्यात हॉटस्पॉट ठरला आहे. असे असले तरी गोंदिया तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रात बँक प्रशासनाकडून कोरोना संदर्भात कसलीच खबरदारी घेतली जात नसल्याचे समोर आले आहे. ग्राहकांची गदी होत असूनही बँक प्रशासनाकडून ग्राहकांना सॅनिटायझर व वैयक्तीक अंतर राखण्याच्या सूचना दिल्या जात नाहीत. या प्रकारामुळे कोरोना संदर्भात शासनाने दिलेल्या दिशा–निदेश्रांकडे दुर्लक्ष केले जात आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे.

कोरोना विषाणू संसर्गाने देशासह राज्यात थैमान घा–तले आहे. गोंदिया जिल्ह्यातही कोरोनाचा उद्रेक झाला असून बाधितांची संख्या ७ हजारावर गेली आहे. अशा परिस्थितीत संसर्गाला आटोक्यात आणण्यासाठी जिल्हा यंत्रणा कसोसीचे प्रयत्न करीत आहे. जनजागृती, खबरदारी, प्रबोधनाच्या माध्यमातून



नागरिकांना सतर्क व सुरक्षित राहण्याचा सल्ला दिला जात आहे. राज्य शासनाने अनलॉक प्रक्रियेतंर्गत सवलत देणे सुरू केले आहे. परंतु, अटी, शतीच्या अधिन राहून व्यवहार करणे बंधनकारक आहे. सार्वजनिक व गदी होणाऱ्या ठिकाणी कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजनांना महत्व दिले जात आहे. येणाऱ्या नागरिकांसाठी सॅनिटायझर, वैयात्तीक अंतर राहणार, अशी तजविज करण्याचे सूचना आहेत. असे असले तरी गोंदिया ग्रामीण क्षेत्रातील बँकांमध्ये नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात असल्याचे दिसत आहे.

तालुक्यातील रावणवाडी येथील विदर्भ कोंकण ग्रामीण बँक व कॉपरेटिव्ह बँक येथे सॅनिटायझर, तापमान तपासणीकरिता कोणतेही यंत्र उपलब्ध नाही. ग्राहक सर्रासपणे सोशल डिस्टन्सचा फज्जा उडवित आहे. मास्कचा वापर केला जात नाही.

बँक अधिकारी, कर्मचाऱ्यांसमोर सर्व होत असताना याकडे दुर्लक्ष केले जात आहे. या संदर्भात काही सुज्ञ नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले असता त्यांच्याशी अरेरावी केली जाते. याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रीत करून बँक प्रशासनाला जाब विचारावा, अशी मागणी परिसरातील जनतेकडून केली जात आहे.

# २ लाख २८ हजार कुटुंबापर्यंत गृहभेटीतून पोहोचले प्रशासन




## ■ माझे कुटुंब-माझी जबाबदारी- माझी जनजागृती
## ■ १० लाख ४७ हजार ७४२ नागरिकांना माहिती मिळण्यास मदत
## ■ १९ हजार ५३६ अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवकांचा सहभाग



**गोंदिया:** जिल्ह्यात कोरोनाची साखळी तोडून कोरोनाला जिल्ह्यातुन हद्दपार करण्यासाठी ३ ऑक्टोबर रोजी माझे कुटुंब-माझी जबाबदारी-माझी जनजागृती या मोहिमेअंतर्गत १९ हजार ५३६ अधिकारी-कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी जिल्ह्यातील २ लाख २८ हजार ४ कुटूंबांच्या गृहभेटी घेऊन कोरोना संसर्ग रोखण्यासाठी तसेच या विषाणूंमुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी तसेच आपण कुठली काळजी घ्यावी याविषयीची माहिती दिली. त्यामुळे या कुटुंबाच्या माध्यमातून १० लाख ४७ हजार ७४२ नागरिकांपर्यंत माहिती पोहोचण्यास मदत झाली आहे. या मोहिमेत जिल्ह्यात कोरोनाचा आलेख कमी होण्यास निश्चितच मदत होणार असून लवकरच कोरोना जिल्ह्यातून हद्दपार होण्यास हातभार लागेल.

राज्य शासनाने या आजाराविषयी शिक्षण देणारी माझे कुटुंब-माझी जबाबदारी ही मोहीम राज्यात सुरू केली. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आज ३ ऑक्टोबर रोजी जिल्हा प्रशासनाने लोकांच्या सहभागातून या मोहिमेत एक पाऊल पुढे टाकून जिल्हाधिकारी मीना यांच्या संकल्पनेतून आणि त्यांनी केलेल्या सूक्ष्म नियोजनामुळे ङ्गमाझे कुटुंब - माझे जबाबदारी-माझी जनजागृतीङ्ग या नाविन्यपूर्ण उपक्रमाला अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले.१० हजार अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवकांचा या मोहिमेत सहभाग अपेक्षित असतांना प्रत्यक्षात मात्र १९ हजार ५३६ जणांनी यामध्ये सहभाग घेतला.१ लाख कुटुंबाला गृहभेटीचे नियोजन असतांना प्रत्यक्ष २ लाख २८ हजार ४ कुटुंबाला गृहभेटी देण्यात आल्या. यामधून जिल्ह्यातील १० लाख ४७ हजार ७४२ नागरिकांपर्यंत या मोहिमेच्या माध्यमातून कोरोना विषयक जनजागृती करण्यास मदत झाली.

गोंदिया तालुक्यात ३४२७ अधिकारी -कर्मचारी स्वयंसेवकांनी ४३ हजार ७९२ कुटुंबांना भेटी दिल्या. या भेटीतून २ लाख ८ हजार ९५६ नागरिकांना, तिरोडा तालुक्यातील २६१४ अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवक यांनी ३६ हजार २९७ कुटुंबांना भेटी दिल्या.यामधून १ लाख ४५ हजार १८८ नागरिक,गोरेगाव तालुक्यात १८५७ अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवकाने १९२८९ कुटुंबाना भेटी दिल्याने ८२ हजार २३२ नागरिक, आमगाव तालुक्यात २१४८ अधिकारी कर्मचारी व स्वयंसेवकांनी २७ हजार २८ कुटुंबांना भेटी दिल्या यातून एक लाख २२ हजार ४६५ नागरिक, सालेकसा तालुक्यातील १३८३ अधिकारी कर्मचारी व स्वयंसेवकांनी १५ हजार ३९४ कुटुंबांना भेटी दिल्या यामधून ७४ हजार २०८ नागरिक, देवरी तालुक्यात १७९८ अधिकारी कम'चारी व स्वयंसेवकांनी १९ हजार २९१ कुटुंबांना भेटी दिल्या यामधून १ लाख १८ हजार ४५० नागरिक, सडक-अर्जुनी तालुक्यात १७३० अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवक यांनी १८ हजार ९८१ कुटुंबांना भेटी दिल्या यामधून ७५ हजार ९२४ नागरिक आणि अर्जुनी/मोरगाव तालुक्यात २५७९ अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवक यांनी २७ हजार ९३२ कुटुंबांना भेटी दिल्या यामधून १ लाख २० हजार ३१९ नागरिकांना माहिती मिळण्यास मदत झाली आहे.

अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवकांनी किमान दहा कुटुंबांना भेट घेऊन कोरोना प्रतिबंधक उपाययोजनेबाबत माहिती दिली. कुटुंबातील व्यक्तीला कोरोना विषाणूची बाधा होऊ नये यासाठी प्रत्येकाने शरीराचे तापमान व ऑक्सीजन पातळी मोजावी. सातत्याने तोंडाला मास्क घालून राहावे. मास्क घातल्याशिवाय घराबाहेर पडून नये.दर दोन-तीन तासांनी सतत हात साबणाने व पाण्याने स्वच्छ धुवावे. तसे करणे शक्य नसल्यास सॅनीटायझरचा वापर करावा. नाक,तोंड,डोळे यांना वारंवार हात लावू नये. ताप आल्यास तसेच सदी, खोकला, घसा दुखणे, थकवा अशी लक्षणे असलेल्या व्यक्तींनी जवळच्या फिव्हर क्लिनिकमध्ये जाऊन तपासणी करून घ्यावी. मधुमेह, हृदयविकार,किडनी आजार,लठ्ठपणा असल्यास दररोज तापमान व ऑक्सिजनची पातळी मोजावी. तापमान ९८.६ पेक्षा जास्त असल्यास जवळच्या फीवर क्लिनिकमध्ये जाऊन तपासणी करावी.सध्या सुरू असलेले आजारपणातील उपचार सुरू ठेवावेत.खंड पडू देऊ नये. डॉक्टरांकडून नियमित तपासणी करावी. कोरोना बाधित असलेल्या व्यक्तींनी होम आयसोलेशनमध्ये राहावे. घराबाहेर पडू नये.स्वतंत्र टॉयलेट, बाथरूम व जेवणाची भांडी वापरावी. कपडे स्वतंत्र धुवावे.ताप व थकवा जाणवल्यास रुग्णालयात जाऊन तपासणी करावी.

कोविड होऊन गेलेल्या व्यक्तीने रुग्णालयातून येऊन पुन्हा सात दिवस घरी होम आयसोलेशनमध्ये राहावे. कोविड-१९ चा आजार होऊन गेला म्हणून वैयक्तिक प्रतिबंधाच्या बाबीकडे दुर्लक्ष करू नये. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, किडनी आजार इत्यादी आजार असल्यास या आजारावर वैद्यकीय सल्ल्यानुसार औषधोपचार सुरू आहे याची खात्री करावी. कोविड-१९ मधून बरे झालेल्या व्यक्तीस प्लाजमा दान करावयाचा असल्यास एसबीटीसी या संकेतस्थळाची माहिती आदी माहिती गृहभेटी देणा?्या अधिकारी-कर्मचारी व स्वयंसेवकांनी गृह भेटीदरम्यान कुटुंबांना दिली.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी जिल्हा स्तरावर, उपविभागीयस्तरावर, आणि तालुकास्तरावर बैठका घेण्यात आल्या.यासाठी जिल्ह्यातील नागरिक, सेवाभावी संस्था,पदाधिकारी समाजातील विविध घटकांचे सहकार्य मिळाले.गृहभेट देऊन जनजागृती केलेल्या कुटुंबाबाबतचा अहवाल विहित प्रपत्रात संकलीत करण्यात आला. माझे कुटुंब- माझी जबाबदारी या अभियानात ही नावीन्यपूर्ण मोहीम मैलाचा दगड ठरली.आजच्या या आरोग्यविषयक मोहिमेला जिल्ह्यात लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

## माझे कुटूंब-माझी जबाबदारी-माझी जनजागृती मोहिमेचा जिल्हास्तरीय शुभारंभ



**गोंदिया:** जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे या आजारावर प्रतिबंध घालून लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हाधिकारी दीपक कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात आज ३ ऑक्टोबर रोजी माझे कुटूंब-माझी जबाबदारी-माझी जनजागृती या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील १० लाख लोकांपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवून जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे,पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदिश पांडे, तहसीलदार राजेश भांडारकर, अपर तहसीलदार अनिल खडतकर, गोंदिया नगर परिषदेचे मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी सुनील चावला व विक्की थदानी यांच्या प्रमुख उपस्थितीत गोंदिया येथील गांधी चौकात महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन या जिल्हास्तरीय मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

माझे कुटूंब-माझी जबाबदारी ही राज्य शासनाची महत्वाकांक्षी मोहिम आहे. या मोहिमेद्वारे जिल्ह्यात ङ्गमाझे कुटूंब-माझी जबाबदारी-माझी जनजागृतीफ अभियान राबविण्यात येत आहे. या नाविन्यपूर्ण अभियानाद्वारे एकाच दिवशी जिल्ह्यातील १० लाख लोकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. याकरीता अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, आरोग्य यंत्रणा, अंगणवाडी सेविका, महसूल विभाग, पोलीस विभाग, सामाजिक संस्था, राजकीय पदाधिकारी, समाजसेवी व्यक्ती आणि कर्तव्यदक्ष नागरिक तसेच इतर नागरिक जे स्वेच्छेने या मोहिमेत सहभागी होवून जिल्ह्यातील प्रत्येक कुटूंबाच्या घरोघरी जावून कोरोना बाबतची माहिती आणि काय करावे व काय करु नये याची माहिती देणार आहेत. तसेच एका व्यक्तीद्वारे १० व्यक्तींना जी माहिती देण्यात आलेली असून त्या १० कुटूंबाने प्रत्येकी १० लोकांमध्ये या मोहिमेविषयी जनजागृती करण्याचे आजच्या या मोहिमेतून आवाहन करण्यात येत आहे.

माझे कुटूंब-माझी जबाबदारी-माझी जनजागृती या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी आपल्याकडे सर्व्हेक्षण करण्याकरीता घरी येणाऱ्या चमुला जिल्ह्यातील नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



### शिक्षणाधिकारी(माध्य)प्रफुल्ल कचवे यांनी ससाकरणटोला येथील कुटुंबाशी साधला सवांद

माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेंतर्गत माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी प्रफुल्ल कचवे यांनी आमगाव तालुक्यातील चिरचाळबांध नजिकच्या ससाकरणटोला येथील कुटुंबाची भेट घेऊन माझे कुटुंब, माझी जबाबदारीचे महत्व समजाऊन देत चर्चा केली.यावेळी जि.प.वरिष्ठ केन्द्र शाळा चिरचाळबांधचे मुख्याध्यापक खापर्डे, ह.भा प.हाय.व क.महा. चिरचाळबांधचे स.शि. बन्सीधर शहारे, ससाकरणटोला शाळेचे कटरे, आंगणवाडी शिक्षिका मौर्य मॅडम ऊपस्थित होते.

## उपमुकाअ राठोड यांनी सटवा येथे केला माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेचा शुभारंभ

**गोंदिया-** शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या माझे कुटुंब माझी जबाबदारी मोहिमेचा आज गोंदिया जिल्ह्यात शुभारंभ झाला असून त्या अंतर्गत जिल्हा परिषद गोंदियाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता श्री राठोड यांनी गोरेगाव तालुक्यातील सटवा येथे भेट देऊन या मोहिमेचा शुभारंभ करून १० कुटुंबांना भेटी देऊन मार्गदर्शन केले.



जिल्ह्यात एकाच दिवशी किमान १० लाख नागरिकांपर्यंत कोविड-१९ संदर्भात माहिती व जनजागृती व्हावी या उद्देशाने माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम राबविण्यात आली. या अंतर्गत गोरेगाव तालुक्यातील सटवा येथे मोहिमेचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता श्री राठोड यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. यावेळी सरपंच विनोद पारधी, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे शालेय स्वच्छता सल्लागार भागचंद रहांगडाले, तलाठी सोनवणे, पोलीस पाटील टीकाराम रहांगडाले, उपसरपंच ओमप्रकाश चौधरी, मुख्याध्यापक बीजेवार, ग्रामसेविका पाटील यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, शाळेतील शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गावातील प्रत्येक कुटुंबाला भेटी देण्या संदर्भात नियोजन करून गृहभेट देण्यात आली. गावातील २६४ कुटुंबांना भेटी देण्यासाठी २६ अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांच्या मार्फत भेटी देऊन मार्गदर्शन व जनजागृती करण्यात आली.

### आ.चंद्रिकापुरे यांच्या हस्ते शुभारंभ

**नवेगावबांध :** गावासह राज्यात प्रशासनाने माझे कुटुंब माझी जबाबदारी या अभियानाची १५ सप्टेंबर पासून २५ आक्टोबर पर्यंत चालणाऱ्या अभियानाचा अर्जुनी-मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार मनोहर चंद्रिकापूरे यांच्या हस्ते सकाळी कार्यालयातून सुभारंभ करण्यात आला.यावेळी आमदार मनोहर चंद्रीकापुरे , उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले, सडक अर्जुनीच्या तहसीलदार उषा चौधरी, सडक अर्जुनी गटविकास अधिकारी एम एस खुने, डॉ अविनाश काशीवार, एप.आर.टी. शहा, व महाराष्ट्र पत्रकार संघ गोंदिया जिल्हाध्यक्ष सतीश कोसरकर, संपर्क प्रमुख मुन्नाभाई नंदागवळी आदी मंडळी उपस्थित होते.

### गोरेगाव मोहिमेलाही प्रतिसाद

**गोरेगाव:** माझे कुटुंब - माझी जबाबदारी -माझी जनजागृती या गोंदिया जिल्ह्याने राबवलेल्या उपक्रम अंतर्गत गोरेगाव नगरपंचायत कर्मचारी,शिक्षक,आशा सेविका ,अंगणवाडी सेविका, कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालय कम'चारी,सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय कर्मचारी, covid care centre गणखेरा येथील डॉक्टर इत्यादीं शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच Lioness Club Goregaon यांनी गोरेगाव नगरपंचायत क्षेत्रात प्रत्यक्ष गृहभेटीतून जनजागृती केली. या जनजागृती मोहिमेत सुमारे ९३ जनजागृती प्रचारकांनी ९५० कुटुंबाना भेटी दिल्या.या मोहिम `बाबत प्रचार करण्यासाठी अध्यक्ष इंजि.आशिष बारेवार यांनी स्वतः home isolation मध्ये असूनही digital माध्यमातून सहकार्य केले.



## ओबीसींच्या मुद्यावर ओबीसी मंत्री भेटले मुख्यमंत्र्यांना



**मुंबई** :-राज्यात बहुसंख्येने असलेल्या ओबीसी समाजाला अद्यापही मंडल आयोगाच्या तरतुदीनुसार आरक्षण मिळालेले नाही.गेल्या अनेक वर्षापासून नोकरभरती बंद असल्याने ओबीसींना नोकरीत स्थान मिळालेले नाही,सोबतच पदोन्नतीतही अन्याय सहन करावा लागत आहे यासह अनेक मुद्यांवर तसेच ओबीसी आरक्षणातील शिरकावावर आपली भूमिका मांडल ओबीसी मंत्र्यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना निवेदन सादर केले आहे. यावेळी मुख्यमंर्त्यांनी ओबीसीवर कुठल्याच परिस्थितीत अन्याय होऊ देणार नसल्याचे आश्वासन देत निवेदनावर सकारात्मक चर्चा केली. यावेळी ओबीसींचे राष्ट्रीय नेते, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगनराव भूजबळ, बहुजन कल्याण, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री विजय वडेट्टीवर, गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे, वनमंत्री संजय राठोड उपस्थित होते.

## घरकुल लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून द्या

**अर्जुनी मोरगाव :** शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत व इतर योजनेतून मंजूर असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून द्यावे व शहरातील अतिक्रमण धारकांना त्वरित पट्टे देण्यात यावे असे आशयाचे निवेदन नगराध्यक्ष किशोर शहारे यांचे नेतृत्वात उपविभागीय अधिकारी शिल्पा सोनाले यांना देण्यात आले.



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातनुसार अर्जुनी मोरगाव नगरपंचायत क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत संपूर्ण प्रभागांमध्ये घरकुल देण्यात आली आहे.

सध्या रेतीघाट बंद असल्यामुळे सदर लाभाथी घरकुलांचे बांधकाम करू शकत नाही प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्यात यावी जेणेकरून अडकलेली घरकुलांचे बांधकाम करणे सोयीचे होईल त्याच प्रमाणे अर्जुनी मोरगाव नगरपंचायत क्षेत्रातील प्रभाग क्रमांक एक, दोन, तीन, तीन व चार मधील अतिक्रमण धारकांचे जागेचे पट्टे मिळण्याबाबत अनेकदा पत्रव्यवहार करूनही अजून पर्यंत सदर अतिक्रमण धारकांना पट्टे मिळाले नाही तेव्हा सदर प्रभागातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळण्यास सोयीचे होईल यादृष्टीने सदर प्रभागातील नागरिकांना त्वरित जागेचे पट्टे देण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

निवेदन देतेवेळी नगराध्यक्ष किशोर शहारे, नगरसेवक मुकेश जायसवाल,माणिक घनाडे, विजय कापगते, ममता पवार, यमुताई ब्राह्मणकर, वंदना जांभूळकर, वंदना शहारे, व उर्मिला जुगनाके उपस्थित होते.

## बीजीडब्लूच्या कोविड कक्षात १२ कोविड गर्भवतीची प्रसूती

**गोंदिया :** कोविड गर्भवतींची प्रसूतीची सोय नसल्याने त्यांना नागपूर मेडिकलला रेफर केले जात होते. त्यामुळे गर्भवती महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांना त्रास सहन करावा लागत होता. आता ही अडचण दूर झाली असून येथील बीजीडब्ल्यू रुग्णालयात यासाठी विशेष कक्ष तयार करण्यात आले आहे.

मागील आठ दिवसांच्या कालावधीत या कक्षात १२ कोविड गर्भवतींची प्रसूती करण्यात आली. तर ४ कोविड गर्भवंतीवर सिझरिंगची शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यामुळे आता कोविड गर्भवतींना रेफर टू नागपूर करणे पूर्णपणे बंद झाल्याचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता नरेश तिरपुडे यांनी सांगितले.कोविड काळात प्रसूती रुग्णांना पहिल्यांदा दिलासा देणारी बाब शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून साकारली गेली आहे.नव्या अधिष्ठांतानी केलेले हे कार्य दखल घेणारे ठरले असून जिल्हाधिकारी दीपककुमार मीना यांनीही त्यांचे कौतुक केले आहे.

सप्टेंबर महिन्यात रुग्णालयातच ३३१ नॉन कोविड महिलांची प्रसुती करण्यात आली असून यामध्ये १४६ सिझरिंग करण्यात आले असून बाई गंगाबाई रुग्णालयात येणार्या गावखेड्यातील महिला रुग्णांना आता कुठलाच त्रास प्रसुतीकरीता होणार नसल्याची ग्वाई अधिष्ठाता डॉ. तिरपुडेंनी दिली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सीटी स्कॅन मशिन बंद असल्याने रुग्णांना खासगी रुग्णालयात जावून उपचार घ्यावा लागत होता.आता ही समस्या सुध्दा दूर झाली असून नवीन सीटी स्कॅन मशीन सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यत २०० रेमडेसिव्हरचे इंजेक्शन उपलब्ध असून २००० इंजेक्शनची मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.




कोरोना संक्रमण काळात रुग्णांची गैरसोय होणार नाही, यासाठी केटीएस आणि मेडिकलमध्ये बेडची संख्या वाढविण्यात आली आहे.या दोन्ही रुग्णालयात आतापर्यंत ७७६ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण दाखल होते. यापैकी ५६३ रुग्ण कोरोनामुक्त होवून घरी परतले आहेत. कोरोना रुग्ण बरे होण्याचा दर ७१.२६ टक्के आहे. आत्तापर्यंत जे रुग्ण दगावलेत त्यापैकी ९० टक्के रुग्ण हे आपल्या जुन्या आजारामुळे दगावले असून ज्यांना कोरोनाची लागण होत आहे, किंवा जुना आजार त्रास देऊ लागते असे रुग्ण वेळेत रुग्णालयात पोचत नसल्यानेच त्यांना वेळेवर उपचार मिळत नाही,त्यामुळे वेळेवर रुग्णालय गाठणे आवश्यक असल्याचेही डॉ. तिरपुडे यांनी सांगितले.

डॉक्टर आणि परिचारिकांची रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. १६ पैकी ६ डॉक्टर आणि ७१ पैकी ३ परिचारिका रूजू झाल्या आहेत. लवकरच इतर समस्या सुध्दा मागी लावण्यात येणार आहे.सोबतच येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्लाझ्मा थेरपी सेंटर नसल्याने कोरोनाच्या गंभीर रुग्णांवर प्लाझ्मा थेरपी करण्याची अडचण निर्माण होते. तर प्लाझ्मा डोनर तयार असताना सुध्दा थेरपी करण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री नसल्याने अडचण निर्माण होत होती. ही अडचण आता दूर केली जाणार असून येत्या पंधरा दिवसात मेडिकलमध्ये प्लाझ्मा थेरपी सेंटर सुरू करण्यात येणार असल्याचे अधिष्ठाता तिरपुडे यांनी सांगितले.

२४ तासात मिळणार अहवालगोंदिया येथील स्वॅब नमुने तपासणी प्रयोगशाळेत नमुने तपासणीची संख्या वाढल्याने आठ आठ दिवस अहवाल मिळत नव्हता. परिणामी संसर्ग वाढण्याचा धोका निर्माण झाला होता. मात्र आता स्वॅब नमुने तपासणीचे प्रमाण वाढविण्यात आले असून २४ तासात स्वॅब नमुन्याचा अहवाल मिळणार आहे.

**७२३६ रुग्णांचे कॉन्टक्ट ट्रेसींग:-** गोंदिया जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र,तालुका रुग्णालयासह गोंदिया शहरातील ८ केंद्रावरुन २६५०० जणांची एंटीजन टेस्ट करण्यात आली असून येथून २८०० रुग्ण पॉझिटिव्ह आढळून आल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.श्याम निमगडे यांनी दिली. पॉझिटिव्ह आढळलेल्या रुग्णांच्या संपर्कातील लोंकाची माहिती २४-३६ तासात गोळा करण्यात येत असून प्रसार प्रसिध्दीकरीता गावपातळीवर व शहरात पत्रकांचा वापर होत असल्याचे सांगितले.

**माझे कुटुंब माझी जबाबदारी-** मोहिमेकरीता जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागासह पोलीस, महसुल विभागातील कर्मचारी, सामाजिक संस्था, महिला बचतगट,शेतकरी गट, स्वस्त धान्य दुकानदार, सरपंच,नगरसेवक आणि आरोग्य विभाग अहोरात्र काम करीत असून १४ लाख ११ हजार लोकसंख्येपर्यंत पोचण्यासाठी एका व्यक्तीला १० कुटुंबाची माहिती प्रपत्राच्या माध्यमातून संकलित करावयाची आहे. आत्तापर्यंत १ लाख ८० हजार कुटुंबाचा सर्वे करण्यात आल्याची माहिती अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेश खेवले यांनी दिली.सोबतच खासगी रुग्णालयात रुग्णांना दिले जात असलेल्या बिलांची तपासणी करण्यासाठी पथक नेमले असून दररोज माहिती अपडेट करण्यात येत असल्याचेही सांगितले. सोबतच उपजिल्हाधिकारी राहुल खांडेभराड यांनी सांगितले की शहरातील ३ खासगी लॅबमध्ये कोरोना टेस्ट करण्यात येत असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात निशुल्क टेस्ट करण्यात येत आहे.

## गणखैरा येथील चोरी प्रकरणातील आरोपींना पोलिसांचे अभय!

**गोंदिया** - गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्या अंतर्गत येत असलेल्या गोरेगाव तालुक्यातील गणखैरा येथील ट्रॅक्टर बॅटरी चोरी प्रकरणातील आरोपींवर कोणतीच कारवाई न केल्याने आरोपींना पोलिसांचे अभय असल्याचे बोलले जात असून गावांत पोलिसांविरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार गणखैरा येथील फिर्यादी रविंद्र चुन्नीलाल पारधी यांच्या मालकीचे ट्रॅक्टर आहे. नेहमीप्रमाणे २४ सप्टेंबर २०२० रोजी शेतीचे कामे आटोपून त्यांनी आपले ट्रॅक्टर आपल्या घरातील आवारात आणून ठेवले होते. दुसऱ्या दिवशी २५ सप्टेंबर रोजी नेहमीप्रमाणे पहाटे ५ वाजता उठून गोठ्यातील जनावरे बाहेर काढत असताना त्यांची नजर ट्रॅक्टर कडे गेली असता ६ हजार ६०० रुपये किमतीचे बॅटरी चोरी गेल्याचे निदर्शनास आले. लगेच त्यांनी आपल्या भावाला या संबंधात माहिती दिली व दोघेही मोटरसायकलने चोरास शोधण्यासाठी निघाले असता आरोपी एक इसम गणखैरा कडून पूरगावकडे प्लास्टिक बोरी मध्ये बॅटरी घेऊन जात असल्याचे दिसले. लगेच त्याला थांबवून त्याची झडती घेतली असता त्यांना बॅटरी आढळून आली. यासंबंधी फिर्यादी यांनी गोंदिया ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

आरोपी दाणी यांच्या विरोधात भादंवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र त्याच्यावर कोणतीही कारवाई न करता आरोपींना सोडून देण्यात आले. दुसऱ्या दिवशी गावांत येऊन आरोपींनी आपले काय झाले, आपले कोणी वाकडे करू शकत नाही या आविर्भावात वावरत असल्याने फिर्यादीसह गावातील नागरिकां मध्ये पोलिसां विरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले.